# माणूस

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

एक न वाचले गेलेले खळबळजनक पुस्तक

१६ नोव्हेंबर १९६८
किंमत चाळीस पैसे

समग्र साप्ताहिक

# माणूस

वर्ष : आठवे : अंक : पंचविसावा

वार्षिक वर्गणी : वीस रुपये

परदेशची वर्गणी : चाळीस रुपये

संपादक

श्री. ग. माजगावकर

सहाय्यक :

दिलीप माजगावकर,

सौ. निर्मला पुरंदरे

---

स. न. 　　　　　　　　　　　　　　　१८ ऑक्टोबर

कालच 'माणूस'चा दीपावली अंक घेतला. आम्ही 'माणूस'चे गेल्या ४ वर्षांपासून नियमित वाचक आहोत. परंतु इतका 'बोगस' दीपावली अंक कधीच वाचला नाही. तरीपण 'माणूस'ने दीपावली अंकांच्या दरबारात आपले स्थान टिकविले असे म्हणावयास हरकत नाही. श्री. बाबासाहेब पुरंदरे यांची कथा अॅडव्हरटाईझइतकी धुंदफुंद वाटली नाही. 'लेनिन क्रांतीतील हिरवळ आणि होरपळ' चांगले आहे. 'राजू' मुळीच आवडले नाही. 'शुभं करोति'ची सुरुवात तर ठीक आहे.

एकंदरीत 'माणूस' दिवाळी अंक वाचून अपेक्षाभंगच झाला. नेहमीप्रमाणे पुढच्या अंकाची वाट पाहत आहोत.

द. खं. निंभोरकर.

कोतवालपुरा-औरंगाबाद

मूल्य ४० पैसे

४१९ नारायण

पुणे २

दूरध्वनी : ५७३५९

---

प्रकाशित लेख, चित्रे, इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे संपूर्णपणे काल्पनिक आहेत.

व्हिएतनामी युद्धाचा शेवट जवळ आल्यासारखा भासत आहे. केवढीही बलाढय भौतिक व तांत्रिक शक्ती असो, जनतेची स्वातंत्र्याकांक्षा तिला केव्हाही नष्ट करता येणार नाही हीच गोष्ट या युद्धाने सिद्ध केली आहे. या युद्धाची समग्र कथा, त्यातील राजकीय पार्श्वभूमी 'माणूस' मधून यापूर्वी निदान दोन वेळा तरी वाचकांसमोर ठेवण्यात आलेली आहे. हा आणखी एक योग. काही दिवसांपूर्वी 'जागृती मंडळ' (मुंबई) या संस्थेचे 'उद्या जेव्हा व्हिएतनाम पुन्हा एक होईल—' या नावाचे 'भारुड' प्रकाशन-अभिप्रायार्थ 'माणूस'कडे आले. व्हिएतनामच्या शूर जनतेला कवींनी, साहित्यिकांनी केलेले हे एक अभिवादन आहे. या छोटेखानी पुस्तिकेची किंमत फक्त पन्नास पैसे असून यातील सर्वच कविता अत्यंत प्रेरक आहेत. योजलेले साहित्य वेळेवर हाती येऊ न शकल्याने यांपैकी काही कविता येथे पुनर्मुद्रित केल्या आहेत.

—संपादक

# संदेश : ७८ व्या वाढदिवसानिमित्त

[उत्तर विएतनामचे राष्ट्रपती हो-चि-मिन्ह यांना त्यांच्या ७८ व्या वाढदिवसानिमित्त जगातील कोनाकोपऱ्यांतून शुभसंदेश आले होते. त्यांना उत्तर म्हणून राष्ट्रपती हो-चि-मिन्ह यांनी चार ओळींची एक कविता लिहून पाठविली. तिचा हा अनुवाद.]

हे मानले : मी ७८ वर्षांचा झालो,
तरीही म्हातारा झालोसे वाटत नाही !
घेतला आहे खांद्यावर
माझ्या देशाचा भार;
आमचे कृतसंकल्प लोक
मोठ्या गौरवाने आगेकूच करताहेत;
प्रत्येक गावावर
विजयश्री त्यांचेच चरण चुंबीत आहे !
आम्ही आमच्या नव्या पिढीसोबत, लोकहो;
पुढे—सदैव पुढेच— चाललो आहोत !

हो-ची-मिन्ह

१६ नोव्हेंबर १९६८

नवोदित राष्ट्रांनो ! चला !
पुकारा स्वातंत्र्य-लढा,
ध्वजा उंचवा दुर्दम्य निष्ठेची.
उभारा तुमच्या जीवनाचे सेतू
द्वेषाच्या स्फोटांनी उद्ध्वस्त झालेल्या
पृथ्वीच्या भगदाडांवरून,
आणि करा आगेकूच.

रवींद्रनाथ टागोर
अनु : रॉक कार्व्हालो

# उद्या :

# जेव्हा आपण

# एक होऊ

त्याच्या भावांना तुडविण्यात आले
तरीही त्याने तोंड उघडले नाही.
अख्खे शरीर नष्ट-भ्रष्ट केले
तरीही त्याचे ओठ शिवलेलेच राहिले.

त्याच्या आईला यातना दिल्या; तरीही
हजारो देशवासियांच्या दुःखमय
जीवनाचा विचार येताच;

ती सारे सोसीतच राहिली.

तिच्या मुलांना रक्तमय चिखलात
घुसळण्यात आले

तरीही ओठातून फक्त एक–
चित्काराचे हसू फुलले,
हलके, लाल रक्तथेंब
तिच्या तोंडातुन ळळळळले
तरीही त्यांचे समाधान झाले नाही
त्यानी आपली हत्यारे परत उचललीच
ती, तर मेली – मेलीच...

मात्र – रात्र झाल्यावर ते दुष्ट दचकतात
स्वप्नातही;
भीतीने अंगावर काटा फुटतो – घाम
फुटतो.
आणि पाहतात. ती अजूनही मंदस्मित
करते आहे.

ते जागे होतात,
हजारो चाबकांचे फटके त्यांच्या
आत्म्यावर कडाडतात.

आमच्या पोलादी भिंतीखालच्या
तळघरात
तिची कबर आम्ही खोदली आहे
उद्या : जेव्हा विएतनाम एक होईल,
कसायांना जबाब द्यावा लागेल; तेव्हा–
त्यांच्या ओठात चित्कारही नसेल.

ओठावर मंद हसू आणि पापण्यांत
अनुराग घेऊन
गुलाबी गालावर स्नेह–पुष्पे उमलतील

जेव्हा देश एक होईल – उद्या...

कवि : **ची लान विएन**
अनु : **नारायण सुर्वे**

# विद्रोही

१ :

सत्तावीस उन्हाळे उलटून गेले आयुष्याला
समजू लागल्यापासून वाचतो आहे
एका लढ्याची कथा.
काटेरी तारांवर अडकलेले मृतदेह,
झाडांवर उलटी टांगून ठेवलेली
सैनिकांची प्रेते,
हर दिवशीच्या पहाटेसोबत पाहतो आहे
असलीच चित्रे...
वाचतो आहे तीच एक संघर्षाची कहाणी
धमन्या ताठर झाल्यावर कळला
त्या गतेतिहासाचा अर्थ;
डोळयांत पेटलेल्या जाळाच्या प्रकाशात
दिसला
उजळून निघालेला सत्याचा लढा,
तेव्हा नतमस्तक झाला माझा टीचभर
आत्मा

२ :

हंगामात सफाईने विळा पेलणारा भूमीपुत्र
विळ्याच्या इतक्याच सफाईने पेलतो संगीन,
दऱ्याखोऱ्यातून, झाडाझुडपांतून लढताना
त्याच भूमीवर टाकतो आपला देह.
सन्मानाचा एक हुंदका देऊन
दफन करतात त्याला त्याचे साथी
आणि दुसऱ्या हुंदक्याला
विसरतात एक साथी गमावल्याचे दुःख
पाठीवर संगीन टाकून निघतात
पुन्हा त्याच दऱ्याखोऱ्यांतून उधळत...
नव्या हंगामात त्याचा नवजवान लडका
तीच संगीन आणि तोच विळा पेलीत
पुन्हा लढतो त्याच भूमीवर...
पुन्हा एकदा सांडतो त्याच भूमीवर रक्त.
तीच कहाणी पुन्हा एकदा नव्या
सूर्याच्या साक्षीने.

३ :

पिकलेल्या कणसाकणसांतून
शिवाराशिवारांतून डोलतात
मायभूमीसाठी रक्त सांडणारे तिथले
भूमीपुत्र
त्याच भूमीवर लढतो आहे माझा
विएतनामी पिता
त्याच भूमीवर लढणार आहे माझा
विएतनामी पुत्र
माझाही देह पडला आहे त्याच भूमीवर
कुणा अनाम भूमीपुत्राच्या रूपात...
माझेच विद्रोही रक्त लढते आहे
लढ्याचे एकेक पर्व
आणि एकेका पर्वातून
उन्नत होत आहे तोच माझा विद्रोही
आत्मा.

सुभाष पांडुरंग सोमण

# गोत्र आपुले

रे स्वातंत्र्यप्रेमी सैनिका
इतिहासाच्या मानकऱ्या
तुला माझा सलाम !
तू रोखलेल्या श्वासात
माझाही ध्यास आहे
उगारलेल्या हातांत
मीही बळ ठेवून आहे
विएतनामी बांधवा
गोत्र आपुले एकच आहे.
तुझ्या दुःखात माझीही वेदना आहे.

तरारून उठणारी ही शेते
त्यांनाही विषवल्लरीची जाणीव आहे
मातीला कुरवाळणारा वारा
तुफान होऊन फिरतो आहे
चार भिंतींआड वावरणारी माता
तटाची भिंत बनून उभी आहे
पाठीवर मूल घेऊन लढते आहे
अशी जिद्द, असा निर्धार
तरी पण मित्रा ! सावध अस
चळू नकोस ढळू नकोस
फक्त दोन घटका
शिल्लक रात्रीचे
दोन प्रहर
त्या रोखलेल्या संगिनींचे
फिरत्या रणगाड्यांचे
गस्त घालणाऱ्या विमानांची
ही शेवटचीच घरघर
अंतिम तुझाच विजय
नि उजाडणारा दिवसही !

शिवराम देवलकर

---

'शुभं करोति'—लेखांक तीन—पुढील अंकी—*संपादक*



## पुरंदरच्या बुरुजावरून

# न्हावीदादा

न्हावी कधी रिकामा बसायचा नाही अन् न्हावी कधी बिन‐बोलका असायचा नाही. सर्वांशी सारख्याच सलगीने वागणारा, बड्याबड्यांचे कान अन् मान धरणारा हा एकमेव बहाद्दर! न्हावी! मोठा कोणी सम्राट चक्र‐वर्ती असला तरी त्याला महिन्या‐तून एकदा तरी मान वाकवावी लागते न्हावीदादांपुढं. या दादांचा महिमा अगाध आहे!

न्हावीदादा म्हणजे साऱ्या गावाचा चित्रगुप्त. गावात कुठे काय घडलंय अन् घडणार आहे ते दादांना विचारा. एक वेळ पाटलाला पत्ता नसेल, पण दादांना माहिती खडान्‐खडा. न्हावीदादा म्हणजे गावातला रेडिओ. हे स्टेशन कधी बंद नसायचंच

**ब. मो. पुरंदरे**



न्हावी मंडळी फार फार विश्वासू बरं. शिवाजी महाराजांना दोन वेळा मृत्यूच्या दाढेतून वाचवलं दोन न्हाव्यांनीच. अफजलखानाबरोबर आलेल्या सय्यद बंदा नावाच्या एका अत्यंत चपळ व शूर हत्यारबंदाने अचानक महाराजांवर चाल केली. तेव्हा वाऱ्यासारखा धावला जिवा महाला. जिवाने एकदम त्या सय्यद बंद्याचा हातच उडवला. एक क्षण उशीर झाला असता तर शिवाजी महाराज बंद्याच्या वाराने ठार झाले असते. पण, होता जिवा म्हणून वाचला शिवा ! हा जिवा महाला जातीने न्हावी होता. याचं आडनाव होतं सकपाळ.

नंतर पुढं पन्हाळयाच्या वेढयातून महाराज निसटले आणि

विशाळगडाकडे धावत पळत निघाले. तेवढ्यात सिद्दीजोहारच्या लोकांनी महाराजांच्या टोळीला पळताना पाहिलं. ती वेळ रात्रीची होती. गर्द अंधार होता. पाऊस पडत होता. वादळी वारा सुटला होता. ढग गडगडत होता. विजा चमकत होत्या. विजेच्या उजेडात शत्रूच्या हेरांनी महाराजांना हेरलं. लगेच पाठलाग सुरू झाला. महाराज शत्रूच्या हाती लागणार की काय अशी भीती वाटू लागली. त्या वेळी शिवा नावाच्या एका न्हाव्याने महाराजांना वाचवलं. हा शिवा पंचवीस तीस मावळ्यांनिशी मागे राहिला. महाराज पुढं सटकले. शत्रूच्या लोकांनी ह्या शिवालाच शिवाजी समजून पकडलं! महाराज वाचले.

अशी ही न्हावी मंडळी मोठी डोक्याची. इतरांच्या डोक्यावर स्वतः जगत अन् स्वतःच्या डोक्यावर इतरांना जगवीत. पूर्वी सैन्यामधे न्हाव्यांकडे फार मोलाचं अन् महत्त्वाचं काम असे. सैनिकांना जखमा होत. बाण आणि गोळ्या अंगात घुसत. त्या काढून टाकून जखमा बांधण्याचं काम न्हावी करीत.

हजामत करता करता एखाद्याचा वस्तऱ्याने घात करणं न्हाव्यांना अशक्य का होतं? शत्रूकडून सोनेचांदी मिळवून फितुरीने आपल्याच छावणीतल्या सरदाराचा किंवा सेनापतीचा प्राण घेणं न्हाव्याला काय अवघड? अहो, वस्तऱ्याला थोडं विषारी पाणी लावलं तरीही काम फत्ते! पण असली फितुरी आमच्या न्हावी जातीने कधीही केली नाही. स्वप्नातही केली नाही. जन्मभर गरिबीत, हसत खेळत कांदाभाकर खाल्ली, पण कधीही फितुरीच्या मेवामिठाईचं पाणी त्यांच्या तोंडाला सुटलं नाही.

पहिला आपला खरा जिगर दोस्त न्हावीच. अगदी पहिल्यांदा जावळ करताना त्यांच्याशी आपला संबंध येतो, तो टिकतो मरेपर्यंत. अन् म्हणूनच नातलगापेक्षाही मायेने आणि जिवलग दोस्तापेक्षाही थट्टेने आपल्याशी बोलण्याचा न्हावीदादांना हक्क आहे. त्यांची जीभ त्यांच्या वस्तऱ्यापेक्षाही झरझर चालते. हजामत संपेपर्यंत शंभर विषयांवर ते बोलतील आपल्याशी. तमाशातल्या लावणीपासून भजनातल्या अभंगापर्यंत अन् ब्रह्मदेवापासून स्वतःपर्यंत सर्व विषयावर ते आपल्याशी मुद्दे-

सूद बोलतील. कोणाशीही बोलताना त्यांना संकोच वाटणार नाही.

एकदा एक गम्मत झाली.

पेशव्यांचे सेनापती परशरामभाऊ पटवर्धन तासगावला राहत असत. हा भला मोठा वाडा. तर, भाऊंचाही फार फार जुन्या संबंधातला न्हावी होता. बोलायला भारी खट्याळ. परशरामभाऊंसारख्या सेनापतीची तो बोलता बोलता थट्टाचेष्टा करावयास कमी करीत नसे. हजामत करता करता हजार बाजारगप्पा चालायच्या. कधी गावच्या, कधी लढाईच्या.

एकदा एका सकाळी हा न्हावी परशरामभाऊंची हजामत करीत होता. भाऊंचे डोके आपल्या डाव्या उभ्या गुडघ्यावर धरून तो वस्तरा फिरवीत होता. गप्पा चालू होत्या. अन् बोलता बोलता त्याचा वस्तरा चर्रकन् सरकला आणि भाऊंच्या डोक्याला किंचितसं कापलं. थोडसं रक्त आलं. वस्तरा लागताक्षणीच भाऊंच्या तोंडून उद्गार उमटला,

"स् स् स् हाऽऽ!"

न्हावी लगेच म्हणाला,

"लई न्हाई लागलं भाऊसाहेब. उलीसंच लागलंय! उगा टिपूसभर रगत आलंय."

एवढं बोलला अन् न्हावी लगेच मिस्किलपणे हसला. त्या हसण्यात जरा खोच होती. भाऊंनी त्याला विचारलं,

"का? फार हसू आलं?"

उघड्या पोटरीवर वस्तरा चटपट वाजवीत न्हावीदादा बोलले,

"न्हाई, म्हनलं शेनापती तुमी! लढाया मारताय म्हनं! आन् उलीसा वस्तरा लागला तर हाश् हुश् करताया. म्हनून म्हनलं की, तरवार खेळनं आन् रक्तात न्हानं ही तुमची कामं नव्हंत. तुम्ही पंचांग सांगावं. पोथी वाचावी. ही: ही:!"

पोटरीवर पुन्हा वस्तरा चटपट वाजवीत न्हावी बारीक हसला.

"असं होय. बरं. एकूण हत्याराशी खेळणं आमचं काम नव्हे तर! हं?"

"व्हय व्हय. तसंच. ते काम वायलं. तुमचं काम वायलं. कढी वरनभात खावा तुम्ही."

न्हावी अगदी ठेवणीतलं हसू हसत होता. परशरामभाऊंच्या लहानपणापासून त्यांची तो 'करीत' आलेला कारागीर. तो संधी सोडतोय होय!

भाऊंनी ते त्याचं म्हणणं ऐकून

घेतलं. हजामत संपेपर्यंत न्हावीबुवा भाऊंना आडून दडून नाजूक शब्दांचे चिमटे घेत होते. भाऊ मुकाट ऐकून घेत होते. अन् हजामत संपली. एक एक हत्यार न्हावीबुवा धोपटीत ठेवू लागले. आणि भाऊंनी हळूच आपले डावे पाऊल न्हाव्याच्या उजव्या पावलावर ठेवले! न्हावी बघतच राहिला. भाऊंच्या पावलाखाली अडकलेलं आपलं पाऊल काढायची धडपड करू लागला. पण भाऊंनी ते आपल्या पाउलाखाली दाबून धरलं होतं. भाऊ हसत होते. अन् भाऊंनी हसत हसत आपल्या नोकराला हाक मारून म्हटलं,

"तो कोपऱ्यातला भाला दे बघू!"

नोकराने तो भाला आणून भाऊंच्या हाती दिला. न्हावी लागला ओरडायला,

"भ–भ–भाऊसाहचेब, आवो आवो सोडा!"

"थांब ना, गम्मत दाखवतो तुला!"

असं म्हणून भाऊंनी भाल्याचा दांडा वर केला, फाळ खाली धरला आणि न्हाव्याच्या पावलावर असलेल्या आपल्या स्वतःच्या पावलावर खच्चकन् घातला! न्हावी जोरजोराने ओरडायला लागला. भाऊ हसत होते. भाऊंच्या पावलातून न्हाव्याच्या पावलांत आणि न्हाव्याच्या पावलातून खाली जमिनीत भाला घुसला होता! रक्ताचं थारोळं झालं होतं. न्हावी ओरडत होता. भाऊ हसत होते. मोठ्याने हसत होते.

"बोल आता, तलवार खेळणं अन् रक्तात न्हाणं कुणाचं काम आहे ते?"

"च–च–चुकलो! चुकलो! भाऊसाहचेब काढा काढा भाला! मेलो मेलो!"


"मी नाही! तूच काढ तुझ्या हातांनी भाला उपसून!"

भाऊ म्हणाले. न्हावी आपल्या हातांनी भाला उपसायची धडपड करू लागला. पण भाला निघेना!

"भाऊसाहचेब! मेलो! भाला काढा! भाला काढा!"

भाऊ हसत होते. तो ओरडत होता. तो आर्जव करीत होता.

नंतर लगेच भाऊंनी भाला उपसून काढला! त्यांनी मग थट्टा करीत करीत न्हाव्याची जखम आपल्या हातांनी प्रथम बांधली आणि मग स्वतःची जखम बांधीत बांधीत त्याच्याकडे पाहत ते धबधब्यासारखे हसले. ●



चौथी सचित्र आवृत्ती

# राजा शिवछत्रपति

ब. मो. पुरंदरे

मूल्य : रुपये बेचाळीस फक्त

राजहंस प्रकाशन
पुणे

१६ नोव्हेंबर १९६८

"पण आपल्याला वर गेलंच पाहिजे,
टेकडी घेतलीच पाहिजे."

आणि ती टेकडी त्यांनी खरोखरच घेतली. अजिक्य समजली जाणारी ती टेकडी इनुयेच्या विलक्षण नेतृत्वाने झपाटलेल्या त्याच्या सहकाऱ्यांनी पराक्रमाची शर्थ करून जिंकून घेतली. इनुये म्हणाला, "डाव्या बाजुला शत्रुकडे जरा विशेष लक्ष द्यायला पाहिजे आणि शिवाय..."
पण ते वाक्य पुरे झालेच नाही...

---

---

---

दुसऱ्या महायुद्धात जपान्यांनी पर्ल हार्बरवर हल्ला चढवीपर्यंत अमेरिका तटस्थ होती. त्यानंतर दोस्तांच्या बाजूने ती युद्धात उतरली आणि युद्धाचा रंग हळूहळू पण निश्चितपणे पालटत गेला. दोस्तांनी जर्मनीविरुद्ध दुसरी आघाडी उघडली आणि जर्मनीची सातत्याने पीछेहाट होऊ लागली. पीछेहाट होतानादेखील जर्मन सैन्याने दोस्तांशी प्रखर आणि कडवी झुंज दिली. या विस्तीर्ण रणमैदानावर कित्येक अविस्मरणीय साहसकथा जन्माला आल्या. अशाच एका साहसकथेचा नायक होता डॅनियल इनुये !

अंगात जपानी रक्त असलेल्या पण अमेरिकन नागरिकत्व स्वीकारलेल्या या तरुण वीराने आपल्या निष्ठा अमेरिकेच्या चरणी समर्पित केल्या होत्या. या निष्ठेच्या

अ नं त भा वे



# डॅनियल इनुये

पोटीच की काय, डॅन इनुयेने युद्धात अद्‌भुत पराक्रम गाजवला. मात्र युद्ध प्रत्यक्ष सुरू झाल्यानंतरच्या थोड्या दिवसांत या निष्ठेबद्दलच शंका व्यक्त केल्या गेल्या होत्या. त्या सगळ्या अभद्र शंकांना इनुयेने स्वयंप्रकाशित कृतीनेच उत्तर दिले. युद्धानंतर अमेरिकन समाज-जीवनामध्येदेखील इनुयेला फार मानमान्यता मिळाली. १९६२ साली तो सिनेटचा सभासद झाला. डॅन इनुयेचा दुसऱ्या महायुद्धातील पराक्रम केव्हाच आख्यायिकास्वरूप झाला आहे.

सर्वत्र चिखल माजला होता. डॅन इनुयेच्या बुटां-भोवती खदखदणारा हा चिकट, थंडगार, निसरडा चिखल त्याला पुन्हा पुन्हा अस्वस्थ करीत होता. कठीण चढाची ती टेकडी चढून जाताना या चिखलामुळे

इनुयेला फार कष्ट पडत होते. इनुयेने हातातील टॉमीगन पुन्हा एकदा सारखी केली. कमरेला असलेले हातबाँब तपासले आणि वरच्या बिकट चढाकड एकवार नीट निरखून पाहिले.

एप्रिल महिन्यात उत्तर इटलीमध्ये दिसणाऱ्या निसर्गशोभेवाचून आणि अर्थात सर्वत्र माजलेल्या चिखलावाचून दुसरे काहीही इनुयेला दिसले नाही. पण आपली प्रत्येक हालचाल शत्रूकडून टिपली जात आहे, याची त्याला नीट जाणीव होती. झाडांचा आडोसा घेऊन मुद्दाम तयार केलेल्या गुहांतून आणि कृत्रिम ढोलींमधून जर्मन सैनिक लपलेले होते. युद्धदृष्टीने अत्यंत महत्त्वाच्या पो नदीच्या खोऱ्यात घुसण्याच्या अमेरिकन सैन्याच्या प्रयत्नाला शह देण्याचा निर्धार या कडव्या जर्मन सैनिकांनी केला होता. ही टेकडी जिंकली असता पो नदीच्या खोऱ्याकडे जाण्याचा अमेरिकन सैन्याचा मार्ग मोकळा होणार होता. म्हणून अमेरिकन सैन्यदेखील इरेला पेटले होते.

इनुयेने आपल्या सहकाऱ्यांना पुढे सरकण्याची आज्ञा दिली. "टेकडी घेतलीच पाहिजे," असे त्याने ठासून सांगितले. 'टेकडी घेतलीच पाहिजे' असे इनुयेच्या तुकडीचे ब्रीदच होते. इटलीमध्ये उतरल्यापासून शत्रूने व्यवस्थित बंदोवस्त केलेल्या कितीतरी टेकड्या या सैन्यविभागाने सर केल्या होत्या. प्रत्येक टेकडी जिंकताना त्यांना घनघोर रणसंग्राम करावा लागला होता.

अगदी पहिली टेकडी सर केली तेव्हाचा युद्धप्रसंग इनुयेला आता आठवला. तेव्हादेखील जर्मन सैनिक असेच दबा धरून बसले होते. अवतीभवती सारख्या गोळ्या उडत होत्या, स्फोट होत होते; त्यातच जर्मनांनी सुरुंग पेरल्यामुळे परिस्थिती अधिकच बिकट झाली होती. प्रत्येक पावलाला मृत्यूला हुलकावणी देऊन पुढे जावे लागत होते. परंतु एका जागी थांबणे तर अधिकच धोक्याचे होते. एक विशिष्ट मशिनगन-ठाणे तर इनुयेच्या तुकडीला कालसर्पिणीसारखे वाटत होते.

या सगळ्याचा इनुयेला संताप आला, आणि इतरांना त्याला संरक्षण देण्यासाठी आवाहन करून तो सरपटत वेगाने टेकडी चढू लागला. थोड्याच वेळात त्या मशिनगनच्या घरट्यापाशी जाऊन पोहोचला तो. चपळाईने हातबॉम्ब काढून त्याने त्या घरट्यावर फेकला. प्रचंड स्फोट झाला आणि घरट्यातील चारही जर्मन सैनिकांच्या चिंधड्या उडाल्या. अल्पावकाशात टेकडी सर झाली !

आज २१ एप्रिल १९४५ रोजी, तशाच परिस्थितीत सॅन टेरेन्झोची ही अनामिक टेकडी सर करताना इनुयेला त्या चार जर्मन सैनिकांची आठवण तीव्रतेने आली. त्यांच्यासारखीच स्थिती आज आपली होणार काय, असा अशुभ विचार त्याच्या मनात आला.

## पुन्हा आगेकूच

तो विचार त्याने मनातून झटकून टाकला आणि कसल्यातरी बेभान निर्धाराने

आडोशाची पर्वा न करता इनुये पुढे सरसावला. त्याचे सहकारी एक क्षणभर स्तंभितच झाले. जर्मनांनी केलेल्या गोळीबाराने इनुयेच्या पायाभोवती उडालेला धुराळा त्यांनी पाहिला आणि तेही पुढे सरसावले. त्यांच्यावर गोळ्यांचा वर्षाव झाला. कित्येकजण मृत्यू पावले. तरीही पाठ फिरवण्याचा विचार इनुयेच्या मनात आला नाही. जर्मनांच्या हल्ल्याचा जोर थोडासा कमी झालेला पाहताच इनुयेने पुन्हा आगेकूच सुरू केली. त्याचे कपडे फाटले होते. सर्वांग चिखलाने भरले होते. पण त्यांच्या चढाईला अटकाव करणारी मशिनगनची तीन घरटी मोडून काढण्यावाचून गत्यंतरच नव्हते.

केवळ एक सैनिक आपल्यावर हल्ला करायला पुढे सरसावतो आहे हे पाहताना त्या जर्मनांचा आपल्या डोळ्यांवर विश्वासच बसेना. आश्चर्यचकित झाल्यामुळे क्षणभर त्यांचा हल्लाच थांबला. कदाचित यामागे अमेरिकनांचा काही खास डाव असेल असे वाटून त्यांनी भोवतालचा परिसर न्याहाळला. एवढी दिरंगाई इनुयेला पुरेशी होती. इनुयेने मशिनगनमधून गोळ्यांचा पाऊस पाडला आणि समोरचे घरटे बंद पडले. तितक्याच त्वरेने डाव्या बाजूच्या घरट्याचीही त्याने विल्हेवाट लावली. पण आता उजव्या बाजूला असलेल्या घरट्यामधून अचूक मारा होऊ लागला. इनुयेच्या कोणातरी सहकाऱ्याने, या बाबतीत, त्याला इशारा देऊन सावध केले. इनुयेने मारा चुकवण्याचा यत्न केला. इतक्यात एक प्रचंड स्फोट झाला आणि इनुये धरणीवर कोसळला. प्रथमतः त्याला कसलाही विचार करता येत नव्हता, हलताही येत नव्हते, तोंडातून शब्द फुटत नव्हता. काही अंतरावर हलणाऱ्या नाझी सैनिकांच्या अंधूक आकृती त्याला दिसल्या. अचानक त्याच्या पाठीतून भयंकर वेदना होऊ लागल्या. मात्र या वेदनांनीच त्याला भानावर आणले.

आणि भानावर येताच वेदनांची पर्वा न करता इनुये पुन्हा उभा राहिला. त्याने टॉमीगन उचलली आणि त्या मशिनगनच्या घरट्याकडे मोहरा फिरवला. एखाद्या स्वयंचलित यंत्रासारखा तो टॉमीगन चालवीत होता. हातबॉम्ब फेकीत होता. एका हातबॉम्बने एक जर्मन गारद झाला. इनुयेने हातात दुसरा बॉम्ब घेतला; इतक्यात एक जर्मन सैनिकाने अवघ्या दहा फुट अंतरावरून झाडलेल्या गोळीने इनुयेच्या उजव्या हाताच्या चिंधड्या उडाल्या.

## विकट हास्य

" इनुये, परत ये. परत ये." त्याचे सहकारी ओरडले. पण इनुयेने पाय फाकवून तोल सावरला आणि निर्जीव झालेल्या उजव्या हातातून हातबॉम्ब डाव्या शाबूत हातात घेण्याचा यत्न केला. पाठीवर झालेल्या जखमेतून रक्त वाहत होते. फक्त काही स्नायुतंतूंच्या आधारे त्याचा उजवा हात लटकत होता. डोक्यावरची लोखंडी टोपी उडून गेली होती. पण तरीही शस्त्र खाली ठेवण्याचा त्याचा इरादा नव्हता. उजव्या हातातील बॉम्ब तो डाव्या हातात घेण्याचा यत्न करीत होता. त्याच वेळी

त्याचा उजवा हात विघणारा नाझी सैनिक आपली बंदूक पुन्हा भरून त्याच्या दृष्टीने माथेफिरू असलेल्या इनुयेचा नायनाट करण्याच्या मार्गाला लागला होता. आपल्या प्रयत्नांत जो अधिक लवकर यशस्वी होईल त्याचे प्राण वाचण्याची शक्यता होती. आणि हे दोघांनाही पुरते कळून चुकले होते.

इनुयेने हातबॉम्ब डाव्या हातात घेतलादेखील. तो फेकण्यासाठी त्याने घाईघाईने हात मागे नेला ; पण ही घाईच त्याला नडली. डाव्या हाताने फेक करण्याचा सराव त्याला नव्हता. त्यामुळे पकड सुटून हातबॉम्ब चिखलात पडला. इनुये तो उचलण्यासाठी खाली वाकला आणि त्याच्या कानांवर त्या जर्मन सैनिकाचे विकट हास्य पडले. तो जर्मन सैनिक अवघ्या दहा फुटांवर होता. आपली पुन्हा भरलेली रायफल त्याने इनुयेवर स्थिर केली होती आणि रायफलीचा चाप तो निश्चयपूर्वक दाबत होता. आता पडलेला हातबॉम्ब उचलायला अवघी नव्हता. सारे संपले होते. डॅन इनुयेला मृत्यूने आपल्या कवेत घेतले होते.

## उत्तरायुष्यातील लौकिक

सतरा वर्षांनंतर, १९६२ साली, वयाच्या अडतिसाव्या वर्षी, डॅनियल इनुये अमेरिकेच्या सिनेटचा सभासद झाला. एका अर्धजपान्याला हा सन्मान अमेरिकेच्या इतिहासात प्रथमच लाभत होता. यापूर्वीच दोन वर्षे इनुयेची अमेरिकन कॉंग्रेसवर निवड झाली होती. या दोन्ही निवडणुकींत तो प्रचंड बहुमताने निवडून आला होता. हवाई बेटाच्या इतिहासात, सार्वत्रिक निवडणुकीत इतकी मते यापूर्वी कोणालाही मिळाली नव्हती. या यशस्वितेपूर्वी कधीतरी 'ज्युनिअर चेंबर ऑफ कॉमर्स' या संस्थेने देशातील असामान्य दहा तरुणांमध्ये इनुयेची निवड केली होती. डॅन इनुयेचे पूर्वायुष्य माहीत नसलेला कोणीही मनुष्य त्याच्या उत्तरायुष्यातील लौकिकाने दिपून जातो.

परंतु सिनेटवर निवडून जाण्यापूर्वी सुमारे वीस वर्षे, दुसऱ्या महायुद्धाच्या वेळी इनुयेची राष्ट्रनिष्ठा संशयास्पद मानून त्याला अमेरिकन सैन्यात शिरण्याची मनाई करण्यात आली होती, हे किती-जणांना ठाऊक असेल ? आणि याचे कारण काय तर तो निसेई होता. अमेरिकेत स्थायिक झालेल्या त्याच्या कुटुंबाचे पूर्वज जपानी होते. आणि दैवघटित असे विल-क्षण होते की, ७ डिसेंबर १९४१ रोजी



**पडलेला हातबॉम्ब उचलणार तोच...**

जपानने अकस्मात पर्ल हार्बरवर हल्ला चढवला त्या वेळी त्यात प्राण धोक्यात घालणाऱ्या पहिल्या काही वीरांत सतरा वर्षांचा इनुये होता. एका नागरी संरक्षण विभागाचा तो वैद्यकीय मदतनीस होता.

७ डिसेंबर १९४१ रोजी जपानने पर्ल हार्बरमध्ये असलेल्या अमेरिकी आरमारावर अघोषित हल्ला चढविला. हा हल्ला सर्वस्वी अनपेक्षित असल्याने पर्ल हार्बरमध्ये भयंकर हलकल्लोळ उडाला. सैन्यात आणि नागरिकांत आकांत माजला. जखमी झालेल्या लोकांची शुश्रूषा करण्याचे काम इनुयेने पत्करलेले होते. हे काम तो अविश्रांत करीत होता. एका प्रसंगी, एका जखमी मुलीला स्ट्रेचरवरून नेत असताना अचानक जपानी विमानांनी केलेल्या मशिनगनच्या माऱ्यात इनुयेचे पथक सापडले. त्या मुलीच्या शरीराच्या चिंधड्या उडाल्याचे भयानक दृश्य इनुयेला पाहावे लागले. इनुयेच्या शेजारी असलेल्या एका अमेरिकन सैनिकाने त्या मुलीच्या छिन्नविच्छिन्न शरीराकडे एकदा डोळे भरून पाहिले आणि नंतर परतणाऱ्या विमानाच्या दिशेने पाहत तो पुटपुटला, "धिक्कार असो या जपान्यांचा!"

ते शब्द इनुयेचे अंतःकरण कापीत गेले. संथपणे त्याने त्या सैनिकाकडे पाहिले. आणि इनुये निसेई आहे असे लक्षात येताच दिलगिरी प्रदर्शित करून तो सैनिक म्हणाला, "तू डॉक्टर आहेस हे त्या पायलटने लक्षात घ्यायला हवे होते. या मुलीला मारणं शोभलं नाही त्याला." त्याने तोंड वळवले आणि विद्ध झालेल्या इनुयेला तेथेच सोडून तो निघून गेला आणि सकाळी जपान्यांनी टाकलेल्या पहिल्या बॉम्ब-नंतर अमेरिकेतील बदलणाऱ्या वातावरणाची डॅन इनुयेला प्रथमच जाणीव झाली.

## घरी जा बाबा तू !

खरोखरच अमेरिकन लोक आणि अमेरिकेतील स्थायिक जपानी यांच्यांतील पूर्वीचे चांगले वातावरण आता गढुळले होते. या जपान्यांकडून घातपात होईल किंवा कदाचित् ते बंडही पुकारतील अशी भीती अमेरिकन सेनाधिकाऱ्यांना वाटत होती. अमेरिकेतील पश्चिमेकडील संस्थानांत असलेल्या एक लाख दहा हजार जपान्यांना त्यांच्या घरांतून आणि शेतावरून हुसकून काढून स्थानबद्ध करण्यात आले होते. यात जसे परदेशी रहिवासी होते तसेच अधिकृत अमेरिकन नागरिकत्व पत्करलेले लोकही होते. हवाई बेटांत गोष्टी इतक्या थराला गेल्या नव्हत्या. परंतु चाळीस टक्के जपानी लोकसंख्या असलेल्या या बेटांत जपान्यांना स्थानबद्ध जरी केले नाही तरी अपमानास्पद वागणूक मात्र यथेच्छ सहन करावी लागली.

पर्ल हार्बरवरील हल्ल्यानंतर दोन आठवड्यांनी घडलेली गोष्ट. स्कोफिल्ड येथील सैनिकी छावण्या झाडण्याचे काम मिळविण्याचा प्रयत्न इनुयेने केला होता. त्याची मुलाखत घेणाऱ्या उग्रमुख सार्जन्टने त्याच्याकडे एकटक पाहत म्हटले, "घरी जा बाबा तू. तुमच्याकडून होतो आहे तेवढा त्रास पुष्कळ झाला."

"पण मी–" इनुयेचा आपला राष्ट्रनिष्ठा घोषित करायचा इरादा होता.

" अधिक काही ऐकायची इच्छा नाही माझी. "

सार्जन्टने मुलाखत संपवली होती.

असाच आणखी एक अनुभव इनुयेला आला. लानीला जाण्यासाठी विमानात जागा राखून ठेवण्याकरिता इनुये तिकिट-कचेरीत गेला होता. इनुयेला पाहताच तिकिटे संपली आहेत असे त्या तिकिट देणाऱ्याने सांगितले आणि पाठोपाठ आलेल्या अमेरिकन नागरिकांना मात्र त्याने निर्लज्जपणे तिकिटे दिली. एका कार्यक्रमाच्या वेळी केवळ इनुयेचे दोस्त म्हणून दोन अमेरिकनांना 'जपानप्रेमी' अशा उपहासगर्भ शिव्या अमेरिकन सैनिकांकडून खाव्या लागल्या होत्या.

या प्रसंगानंतर मात्र इनुये फारसा बाहेर पडेनासा झाला. आपले गौरवर्ण अमेरिकन मित्र तो टाळू लागला. नेहमीचे त्याचे अवखळ बोलणे एकदम कोमेजून गेले. त्याच्या अस्तित्वालाच मुळी जबरदस्त हादरा बसला होता.

हा शोचनीय अनुभव त्याला सर्वस्वी नवीन होता. ७ सप्टेंबर १९२४ या जन्मदिवसापासून आजतागायत कोणीही त्याला परकेपणाने वागवले नव्हते. अमेरिकन शाळा, विविध संस्था, सहकारी, अधिकारी, सगळ्यांनीच त्याला आपला मानले होते. पण युद्धाला तोंड लागल्यावर जपान्यांबद्दलच्या द्वेषाची धग इतकी विलक्षण झाली की तीत हा भूतकाळ जळून खाक झाला. आता पूर्वीचे मित्रही त्याला टाळू लागले. रेडिओ, कॅमेरा, दुर्बीण असल्या वस्तू बाळगायला, इतकेच नव्हे तर शहरातील काही विशिष्ट भागातून फिरायलादेखील, निसेई नागरिकांना सक्त मनाई होती.

पण अमेरिकेत घुमसणाऱ्या या अतिरेकी आणि विकृत जपानद्वेषाने सर्वसामान्य अमेरिकन मनुष्याचे अंतःकरण जरी कलुषित झाले तरी असा एक अमेरिकन नागरिक होता की त्याला त्याचा अनिष्ट परिणाम नेमका माहीत होता. हा माणूस म्हणजे अमेरिकेचा पहिला नागरिक राष्ट्राध्यक्ष फ्रँकलिन रुझवेल्ट होय. त्यांनी मुळी जाहीर केले; राष्ट्रनिष्ठा व्यक्तीच्या मनावर आणि अंतःकरणावर सर्वस्वी अवलंबून असते. वंशपरंपरेचे तत्त्व तिच्या बाबतीत लागू पडत नाही.

या घोषणेनंतर लवकरच वंशपरंपरेने जपानशी नाते असलेल्या पण अमेरिकेत अधिकृतरीत्या स्थायिक झालेल्या नागरिकांच्या सैन्यभरतीला सुरुवात झाली. अखेर एकदा आपली राष्ट्रनिष्ठा देशासाठी प्राणांची बाजी लावून सिद्ध करण्याची संधी निसेई युवकांना मिळाली होती. हवाईमधून सुमारे पंधराशे सैनिकांची भरती होईल असा सुरुवातीचा अंदाज होता. पण अल्पावधीतच दहा हजार उत्साही तरुणांनी आपली नावे नोंदवली. आणि या नामावलीच्या अग्रभागी होता सुदृढ बांध्याचा, कर्तबगार डॅनियल इनुये.

## विश्रांतीचे स्वप्न

मिसीसिपी येथील शेल्बी तळावर शिक्षण पुरे करून इनुये आणि त्याचे सहकारी प्रत्यक्ष रणक्षेत्राकडे निघाले. अपरिचित अटलांटिक महासागर ओलांडून त्यांनी

नेपल्समध्ये पाय ठेवला. येथून पुढे त्यांना 'रात्रंदिन युद्धाचाच प्रसंग' होता. ज्या चारशेबेचाळिसाव्या तुकडीत इनुये होता, ती रोम शहराच्या दक्षिणेला एका गव्हाच्या शेतात अडकून पडली होती. तिला साथ देणाऱ्या शंभराव्या तुकडीवर वाट काढण्याची जबाबदारी पडली होती. या वाटेने इनुयेची तुकडी निसटून जाणार होती. शंभराव्या तुकडीने आपली कामगिरी व्यवस्थित बजावली. पण निसटून जाताना चारशेबेचाळिसाव्या तुकडीला जर्मनांनी यथेच्छ चोप दिला. हातघाईच्या लढाईत तुकडीतील माणसे एकापाठोपाठ गारद होऊ लागली. परंतु या तुकडीचा निर्धार विलक्षण होता. त्यामुळेच तर ते सर्वनाशापासून बचावले. परंतु दक्षिण फ्रान्समधील वर्फाळ आणि पावसाळी व्होसगेस पर्वतातील ब्रूयेरेसच्या लढाईत या तुकडीने खरी तलवार गाजवली. त्यामुळे तिचे नाव सर्वतोमुखी झाले.

लवकरच ही तुकडी इटलीमधून काढून घेतली गेली आणि फ्रान्समध्ये पाय रोवून उभ्या असलेल्या नाझी सैन्याला मागे हटवण्याची कामगिरी तिच्यावर पडली. हा वेळपर्यंत इनुयेने चांगलाच वैयक्तिक लौकिक संपादन केला होता, त्यामुळे त्याला बढतीही मिळाली होती. एका तुकडीचा तो प्रमुख झाला होता. १९४४ सालच्या सुरुवातीला नाईस येथे पोचलेल्या इनुयेच्या अतिश्रान्त तुकडीला खरे म्हणजे काही दिवसांची संपूर्ण विश्रान्ती आवश्यक होती. जादा कुमक मिळाल्याशिवाय पुढे जाणे कसे कठीण आहे, हे इनुयेने वरिष्ठ अधिकाऱ्यांना समजावून सांगितले. परंतु जादा कुमक मिळण्याची शक्यताच नव्हती. खुद्द इनुयेचे तळवे अनेक दिवसांच्या खंदकी लढाईमुळे कुजले होते. चालण्याचेदेखील त्याला संकट वाटत होते. पाणथळ भागात, ओल्या कपड्यांनिशी, कित्येक आठवडे पाऊस अंगावर घेत काढल्यामुळे इनुयेची छाती कफाने भरली होती. विश्रान्तीची त्याला फार फार गरज होती. नाईस आणि फ्रान्स येथील विश्रामकेंद्रात काही दिवस पूर्ण विश्रांती घेण्याचे स्वप्न इनुये पाहत होता.

## काय वाटेल ते कर,

पण त्याच्या विधिलिखितात ती त्या वेळी लिहिलेली नव्हती. एके दिवशी, म्हणजे २६ ऑक्टोबर रोजी, विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी इनुयेला तातडीचे बोलावणे पाठवले. त्याचे कारण स्पष्ट करताना ते म्हणाले, "मला स्वतःला हे करणं पसंत नाही. पण माझासुद्धा नाइलाज झाला आहे. मला मदत पाहिजे तुझी. तुला कसं वाटतंय ?"

इनुयेने खांदे उडवले. तो म्हणाला, "आठ दिवसांत क्वचितच झोप मिळालेल्या माणसाला जसं वाटत असेल तसं वाटतंय मला, पण जाऊ द्या. काय काम आहे ?"

"ब्रूयेरेस येथे छत्तिसाव्या तुकडीचे टेक्झन सैनिक जर्मनांच्या सापळ्यात अडकले आहेत. या तुकडीला सोडवलं पाहिजे आपल्याला, आणि तुझ्या तुकडीशिवाय दुसरं कोणीही मिळणं कठीण आहे."

" परिस्थिती फार गंभीर आहे काय ?" इनुयेने विचारले.

" कमालीची. त्यांचे वरिष्ठ अधिकारी सगळे मारले गेले आहेत. त्यांचा तळच मुळी उखडला गेला आहे. आणि मला वाटतं की या कोंडीत पकडलेल्या तुकडीची निर्दय कत्तल करायला जर्मन मागंपुढं पाहणार नाहीत. अजूनही या प्रदेशांत आपलंच वर्चस्व आहे हे दाखवायचा प्रयत्न करणार ते. एकदा ही कत्तल झाली म्हणजे आपलं मनोधैर्य खचायला उशीर लागणार नाही."

इनुयेने संमतिदर्शक मान हलवली, " मग योजना काय आहे ?" त्याने विचारले.

योजना सोपी होती ! पण त्या संबंधात कसल्याही मार्गदर्शक सूचना मिळणे कठीण होते. अधिकाऱ्याने इनुयेला एवढेच म्हटले, " काय वाटेल ते कर आणि सुटका होऊ दे त्यांची !"

इनुये जिच्या परित्राणासाठी निघाला ती तुकडी बेपत्ता झाल्याला तीन दिवसांचा कालावधी लोटला होता. इनुयेचा मार्ग अत्यंत बिकट होता. डोंगर, अरण्य आणि त्याच्या जोडीलाच गनिमी काव्याने लढणाऱ्या कडव्या जर्मन सैनिकांच्या प्रतिकाराला तोंड देत देत त्याला वाट काढावी लागत होती. दोन दिवस झाले, पण इनुयेने फारशी मजल मारली नाही. तिसऱ्या दिवशी इनुये आपल्या तुकडीला 'आगे बढो'चा हुकूम देणार, इतक्यात एका निरोप्याने वरिष्ठ अधिकाऱ्याकडून आलेला खास हुकूम त्याच्या हाती ठेवला. हुकूम मोजक्या शब्दांचाच, पण धारदार होता : 'हरवलेल्या तुकडीची परिस्थिती चिन्ताजनक. वाटेल ती किंमत द्या आणि तिची सुटका करा.'

इनुयेने हुकूम पुन्हा पुन्हा वाचला. तिची प्रतिक्रिया म्हणून निर्माण झालेल्या आवेगात त्याने हुकमाच्या कागदाचा चोळामोळा करून तो खिशात कोंबला आणि आपल्या तुकडीला 'संगिनी चढवा' असा नवा आदेश दिला. पुढील मार्गक्रमणाला रणगाड्यांचीदेखील साथ मिळणे मुश्कील होते, त्यामुळे छत्तिसाव्या तुकडीला सोडवण्यासाठी हातघाईची लढाई करण्यावाचून गत्यंतरच नव्हते.

संगिनी चढवून इनुयेची तुकडी पुढे सरसावली. जर्मनांचा प्रतिकार विलक्षण प्रखर होता. परंतु इनुयेच्या कणखर, स्फूर्तिदायक नेतृत्वामुळे तुकडीमध्ये एक वेगळेच, अभूतपूर्व चैतन्य संचारले होते. त्यांच्या बेदरकारीमुळे जर्मनांना माघार घेणे भागच पडले. ३० ऑक्टोबर रोजी इनुये इच्छित स्थळी पोचला. त्या तीनशे टेक्झन सैनिकांनी जगण्याची आशा केव्हाच सोडून दिली होती. मृत्यूच्या जबड्यातून आपली सुटका करणाऱ्या इनुयेच्या शूर तुकडीचा त्यांनी त्रिवार जयजयकार केला.

दुसऱ्या महायुद्धातील अविस्मरणीय लढायांमध्ये या लढाईचा अवश्य अंतर्भाव करावा लागेल. या लढाईत अतुलनीय शौर्य गाजवलेल्या इनुयेचे वजन एकोणीस पौंडांनी घटले होते. परंतु त्याला एक शौर्यपदक आणि बढतीही मिळाली. या लढाईत किती सैनिकांचे मोल द्यावे लागले त्याची कल्पना नंतर घडलेल्या एका प्रसंगा-



**संगिनी चढवून इनुयेची तुकडी पुढे सरसावली आणि...**

वरून येईल. वरिष्ठ अधिकाऱ्यांनी, या तुकडीच्या सत्कारासाठी खास संचलनाची योजना आखली. संचलनासाठी जमलेल्या या तुकडीतील सैनिकसंख्येकडे पाहून अधिकारी म्हणाले, " पण आजच्या कार्यक्रमाला सगळ्या तुकडीनं हजर राहायला हवं अशी सक्त आज्ञा होती माझी. "

" सगळी म्हणजे एवढीच उरली आहे ही तुकडी." इनुयेने उत्तर दिले. इनुयेच्या या तुकडीतील अर्ध्याहून अधिक सैनिक गारद वा जबर जखमी झाले होते.

यानंतर इनुयेची तुकडी पुन्हा इटलीला परतली. या खेपेची कामगिरी अधिकच बिकट होती. जर्मन सैन्य अंतिम निर्धाराने उभे राहिले होते. गेले पाच महिने फार मोठ्या सामग्रीने सिद्ध अशा अमेरिकन सैन्य विभागाला त्यांचा बिमोड करता आला नव्हता. ती कामगिरी इनुयेच्या छोट्या तुकडीवर आली आणि त्या तुकडीने पराक्रमाची आणखी एक रोमहर्षक कहाणी निर्माण केली.

राष्ट्राध्यक्ष रुझवेल्ट मृत्यू पावले त्या दिवशी इनुयेच्या तुकडीने काही विलक्षणच पराक्रम गाजवला. त्यांनी शांतपणे संगिनी चढवल्या, ते खंदकातून बाहेर आले आणि कसलीही कदर न बाळगता आगेकूच करायला त्यांनी सुरुवात केली. इनुये अर्थात नेहमीप्रमाणे अग्रभागी होता.

" पण त्यांना पुढे जाण्याची परवानगी कोणी दिली ? " वरिष्ठ अधिकारी विचारू लागले.

[ पृष्ठ ४९ वर ]

# तुटल्या तारा, सूर थांबले!

मस्तकावर चिरंजीव अशी जखम स्वीकारून अनंत क्षितिजाकडे रखडत जाणारा द्रोणपुत्र अश्वत्थामा आणि तशीच तीव्र वेदना उराशी बाळगून जीवनाचा प्रवास करणारी मी यात काहीच फरक उरला नाही. दारुण प्रतिशोधाच्या हातचे बाहुले झाल्यामुळे कदाचित त्याला त्या चिरंजीव वेदनेचा शाप मिळाला असेल. माझ्याबाबतीत, नियतीने माझ्यावर सूडाचा फास टाकून कायमचे दुःखी केले आहे. कारणे भिन्न असली तरी दृश्य परिणाम तोच आता रक्ताळलेल्या भावनांनी, अग्नीची दाहकता असणाऱ्या अश्रूंच्या अग्निबिंदूंनी जीवनाचा प्रवास संपवायचा आहे. या जीवनाच्या अन्ताला देह नष्ट होईल, पण आत्म्याबरोबर ती वेदना मात्र पाठलाग करील. हं ! कदाचित असेही शक्य आहे की त्या वेदनेची तीव्रता कमी होईल... त्या वेळी... दोन विरही आत्म्यांच्या पुनर्मीलनाने !

...पण 'विरही आत्मे' असा विचार करताना पावले थबकतात. थोडीशी जड होतात. कारण... मी विरही झाले आहे हे तुला कळले असेल ? आजपर्यंत मी तुझी फक्त मुक्या भावफुलांनी पूजा केली. ती भावफुले त्यांच्या मनातले हितगुज सांगण्यापूर्वीच मधुकर दुसरीकडे उडून गेला. आजपर्यंत माझ्या मनातली अनेक वादळे मी तुला सांगितली नाहीत. माझ्या मनात तुला आणि तुलाच स्थान आहे हे मी कधीच बोलले नाही. त्यामुळे ही एकांगी पूजा झाली. एखाद्या रागाच्या आरोहाचे सूर छेडले गेले. त्यातून रागाची भावना साकार होण्यापूर्वीच स्वर थिजून

> माझ्या मनात तुला आणि तुलाच स्थान आहे हे मी कधीच बोलले नाही. त्यामुळे ही एकांगी पूजा झाली. एखाद्या रागाच्या आरोहाचे सूर छेडले गेले. त्यातून रागाच्या भावना साकार होण्यापूर्वीच स्वर थिजून गेले...... तारा तुटल्या.

## भार्गव विनायक गोडबोले

गेले...तारा तुटल्या. हे सारे घडावे अशी नियतीची इच्छा असावी. एखादा अंकुर भूमातेच्या गर्भातून वर येण्याअगोदरच तो नष्ट झाला आणि माझी पूजा अपुरी राहिली ...मी तुला पहिल्यांदा पाहिले आमच्या महाविद्यालयाच्या स्नेहसंमेलन-प्रसंगी. त्या वेळचे तुझे भाषण मी कधीच विसरणार नाही. विसरू म्हटले तरी शक्य नाही. भाषणे सारीच माणसे देतात. टाळचाही घेतात. पण अवखळ मूल जसे आईच्या वात्सल्याच्या नजरेने स्तब्ध राहते तसे तुझे भाषण. अत्यंत दंगेखोर म्हणून गाजलेल्या आम्हा मुलांना तू वाक्चातुर्याने जिंकलेस. तुझ्या जीवना-बद्दलचा दृष्टिकोन इतक्या मोजक्या शब्दात सांगितलास...आजपर्यंत आमच्या तोंडी ' जग हे बंदिशाळा ' हेच गाणे होते. सुखाच्या एकाच धाग्यावर आम्ही खूष होतो. नव्हे जगातील साऱ्या दुःखांना पाहून आमचा आशेचा मोहोर गळून पडत होता. पण तू त्या दिवशी म्हणा-लास... " गौतमबुद्ध थोर होते यात शंकाच नाही. पण जीवनाकडे पाह-ण्याच्या त्यांच्या दृष्टिकोनाबद्दल मला शंका आहे. नव्हे त्यांचा दृष्टिकोन तुम्हा–आम्हा सामान्यांकरिता उपयोगी नाही. जराजर्जर वृद्ध पाहून गौतम दुःखी झाला. महायात्रेच्या दर्शनाने त्याच्या नेत्रांत अश्रू उभे राहिले. एका जीव-नाचा अंत पाहताना त्याचे हृदय हेलावले ...पण प्रश्न असा निर्माण होतो...एका जीवनाचा अंत पाहताना ज्या डोळ्यांत अश्रू उभे राहिले त्याच डोळ्यांत एका निष्पाप जीवाच्या जन्माच्या



वेळच्या निरागस बालस्वरांनी आनंदाश्रू का तरळले नाहीत? जराजर्जर वृद्ध पाहून ज्या गौतमाने जग हे दु:खाने भरले आहे असा निष्कर्ष काढला, त्यानेच उसळत्या यौवनाने देहाची नदी दुथडी भरून जाणाऱ्या अनेक युवक–युवतींच्या संघाकडे पाहून या जीवनात आनंदही आहे असे का मानले नाही?...जीवन हे उपभोग घेण्यासाठी आहे. जीवनाच्या प्रत्येक क्षणामध्ये जिवंतपणाचे अमृत आहे. ते प्यायला शिका. मग तुम्हाला असे वाटणार नाही की, एक धागा सुखाचा, शंभर धागे दु:खाचे. क्रियाशील व्हा..."

...तुझ्या त्या बिनतोड सवालांनी आमच्या मनातील निराशेची वलये कुठे विलीन झाली कुणास ठाऊक! आम्हा साऱ्यांच्याच तोंडी तुझे नाव होते तेव्हा. दुसऱ्याच दिवशी तुझ्या घरी आम्ही आमचा मोर्चा वळवला. निमित्त स्वाक्षरीचे... माझ्या मनात वेगळाच हेतू होता. तुझ्या गुणांकडे पाहून मी वेडी झाले होते. पण तुझी मूर्ती अजून नजरेसमोर साकार झाली नव्हती. हृदयमंदिरात तुझी प्रतिष्ठापना करण्यासाठी मी उत्सुक होते. त्या दिवशी तुला पाहिले आणि...!... पण घरातून बाहेर पडताना एक गोष्ट मनावर ठसली. तुझे जीवन व्यक्तिगत सुखांनी मर्यादित होणारे नाही. तुझ्या जीवनाच्या मर्यादा फार मोठ्या आहेत. कारण, तुझ्या घरात दिवाणखान्यात मध्यभागीच एक मोठे तैलचित्र होते...खाली तुझीच स्वाक्षरी होती. त्यातील व्यक्ती कोण होती कुणास ठाऊक. पण ती व्यक्ती क्रांतिकारक असावी. फासाचा दोर टांगलेला होता आणि त्याच फाशीच्या तख्ताकडे एक व्यक्ती डौलाने चालली होती. त्या व्यक्तीच्या चेहऱ्यावरचा निर्धार, बेबंद स्वाभिमान आणि डौलदार चाल ही माझ्या लक्षात राहिली आणि उगाचच त्या व्यक्तीच्या-बरोबर मी तुझी तुलना करू लागले. मन चरकलेच! त्याच चित्राच्या खाली लाल-भडक रंगात दोन ओळी होत्या...मी त्या वाचल्या आणि माझा तो अंदाज खरा ठरला...तुला ऐहिक उपभोग नको होते.

"आई, तुझ्याचसाठी फासाचेही चुंबन घेऊ
स्व-रक्ताच्या लाल बिंदूंनी तुझे नि आमुचे नाते सांगू!"

याच त्या दोन ओळी!

अंतिम नि:श्वसितांनी स्वातंत्र्याचा शिलालेख टंकित करणाऱ्या क्रांतिकारकांचा तू पूजक होतास. सतीचे वाण हाती घेऊन कोणत्याही क्षणी मृत्यूला कवटाळायला निघालेला तू मृत्युंजय होतास, म्हणूनच मी तुला माझे विचार सांगितले नाहीत. अनेक वेळा मनातली वासना उफाळून वर येई...पण प्रत्येक क्षणाला मी मनाला बजावीत असे...या जीवनावर तुझा हक्क नाही. मृत्युपाशांनाही न जुमानणाऱ्या त्या व्यक्तीला तुझा करपाश विळखाही घालू शकणार नाही. आणि अशा रीतीने तुझ्याबरोबर समांतर जीवन जगण्याचा मी निश्चय केला. तुझी फक्त दुरून पूजा करायची. दिवसेंदिवस तू जनमानसात स्थान मिळवू लागलास. तुझ्या नि:स्वार्थ

कृतींनी अनेक लोक तुझ्याभोवती गोळा होऊ लागले. जनमानसांचा तू अनभिषिक्त सम्राटच होतास जणू !

कित्येक वेळा तुझे–माझे अंतर कायम राहणार हा विचार मनात येऊन मी दुःखी होई....पण दुसऱ्याच क्षणी यशाची उन्नत गिरीशिखरे पादाक्रांत करणाऱ्या तुला माझ्या प्रेमपाशांनी बद्ध करणे चांगले होणार नाही. नव्हे, तसे न करणे हेच माझे कर्तव्य आहे असे वाटे. आणि ही मानसपूजा अशीच चालली असती तर...

...पण परवा ती बातमी वाचली आणि जिवंतपणाला मृत्यूचे स्पंदन ऐकू येऊ लागले. भावनांना शोकांनी कवटाळले. कसं सांगू ? तुझ्या आकस्मिक निधनाची वार्ता ऐकली आणि धरतीवर आभाळ कोसळले. माझ्या भावफुलांचे निर्माल्य झाले. लक्ष लक्ष अश्रुबिंदूंनी धरणी ओलीचिंब झाली. पण तू मात्र काही घडलेच नाही अशा शांत चेहऱ्याने रक्तपुष्पात पहुडला होतास. मी किती वाट पाहिली. तू उठशील... साऱ्यांना सांगशील...जीवन हे जगण्यासाठी आहे. क्रियाशील व्हा...पण...Home they brought her warrier dead !

...धाय मोकलून सारा समाजच सागरासारखा हेलकावत होता. मी सुन्न होऊन घरीच पडले होते. पण शेवटी हातात मोगऱ्याची फुले घेऊन मी आले. तुझ्या शेवटच्या स्थानकावर तू पोचला होतास. मला सारखा तुझ्या घरच्या चित्राचा भास होत होता.

थोड्याच वेळात निळसर धुराचा स्तम्भ आकाशात झेपावू लागला. लाल ज्वाला-फुलांचे वस्त्र परिधान केलेली चिता तुला कवटाळण्यासाठी आतुर झाली. ठिणग्यांची कारंजी उफाळू लागली. आणि अनेक आहुतींप्रमाणे तुझी आहुती घेणारा स्वाहाकार सुरू झाला. लालभडक ज्वालांतून तू आम्हाला दिसेनासा होणार होतास. माझ्या हातातली फुले आता कोमेजू लागली होती...शेवट साऱ्यांच्या गदारोळातच तू नाहीसा झालास. मनाला पटेचना. काही केले तरी खरे वाटेना. ती फुले मातीत पडली होती. त्यांचा सुगंध विरून गेला होता. सुगंधाची निष्प्राण कलेवरे शेवटी मातीस मिळत होती.

...एखाद्या मुग्धनाट्याप्रमाणे सारे घडले. आणि मी व्यथित होऊन बसले. कालच रेडिओवर भैरवीचे स्वर लागले होते. माझ्या आनंदभैरवीचे आता रूपांतर झाले होते. दरवेळी माझ्या डोळ्यांसमोर तुझ्या घरचे ते चित्र उभे राहते आणि थोड्याच वेळात त्या चित्रात बदल घडू लागतो. आता ती व्यक्ती फासावर गेली आहे. त्या मुद्रेवरचा निर्धार अजूनही तसाच आहे. फासाच्या दोराला रक्त लागले आहे. आणि रक्ताळलेला तो दोरखंड मला जणू सांगत असतो...जीवन हे जगण्या-साठी आहे...

...आई, स्व-रक्ताच्या लालबिंदूंनी तुझे नि आमुचे नाते सांगू...!

O

# महाराष्ट्रातील दुष्काळ

# व

# त्यावरील उपाययोजना

## एक न वाचले गेलेले खळबळजनक पुस्तक

अन्नस्वतंत्रता सचलन सुरू होण्याच्या खूप आधीची घटना. जवळजवळ चौपन्न सालची गोष्ट. महाराष्ट्रातील एका तरुण शेतकी शास्त्रज्ञाने तेव्हा एक प्रबंध लिहिला होता. प्रबंधाचे नाव होते 'महाराष्ट्रातील दुष्काळ व त्यावरील उपाययोजना.' हा प्रबंध अनेक दृष्टींनी खळबळजनक होता. काही मुलखावेगळे विचार त्यात मांडले होते. स्वतःच्या मतांचे समर्थन करण्यासाठी फार भरभक्कम पुरावा त्यात दिलेला होता. प्रचलित समजुतींना हादरा देणारा हा प्रबंध लिहिणाऱ्या तरुणाचे नाव चारुदत्त दाभोळकर. हा प्रबंध लिहिला तेव्हा हा तरुण ग्लास्गो विद्यापीठात शेतीचे उच्च शिक्षण घेत होता. त्या विद्यापीठातील अनेक सुवर्णपदके त्याने संपादन केलेली होती. आणि या तरुणाचे ज्ञान केवळ पुस्तकी

# ?

नव्हते. महाराष्ट्रात, डन्मार्कमध्ये आणि ब्रिटनमध्ये प्रत्यक्ष शेतावर काम करण्याचा अनुभव पण या तरुणाच्या गाठीशी होता. लोकांच्या समजुतींना हादरा देणारे विचार मांडणेपण या तरुणाला तसे नवे नव्हते. हा तरुण 'किर्लोस्कर' मधून नियमीतपणे शेती विषयावर लेखन करीत होता. या देशात खरेखुरे गोसंवर्धन करावयाचे असेल तर गायी कापणे अगत्याचे आहे या मताच्या याच्या लेखाला तर 'किर्लोस्कर' मासिकाने यापूर्वी अमाप प्रसिद्धी दिली होती. पण या नव्या प्रबंधातले

**दत्तप्रसाद दाभोळकर**

विचार इतके प्रक्षोभक होते, की महाराष्ट्रातला एकही प्रकाशक या पुस्तकाला मिळाला नाही. जवळ जवळ सहा वर्षे धूळ खात हा प्रबंध पडला होता.

पुढे एक दिवस अचानक या पुस्तकाचे तकदीर बदलले. 'रविवार सकाळ'ने लावलेल्या पुस्तकांच्या हस्तलिखितांच्या बक्षीस-योजनेत पहिल्याच वर्षी हजार रुपयांचे पहिले बक्षीस या पुस्तकाला मिळाले. प्राज्ञ पाठशाळेने या पुस्तकाच्या प्रकाशनाचे काम अंगावर घेतले. माननीय शेतकी मंत्र्यांनी या पुस्तकाला प्रस्तावना दिली आणि एक दिवस वाजत गाजत हे पुस्तक प्रसिद्ध झाले. पण हे पुस्तक प्रसिद्ध झाले इतकेच. महाराष्ट्रातील कोणत्याही वृत्तपत्राने या पुस्तकावर अभिप्राय दिला नाही, कोणाही अर्थशास्त्रज्ञाने वा शेतीशास्त्रज्ञाने यातील मतांचे खंडन वा समर्थन केले नाही. मग सर्वसामान्य वाचकांपर्यंत असले पुस्तक पोचण्याचा प्रश्न नव्हताच.—या पुस्तकाच्या पहिल्या आवृत्तीच्या बहुतेक सर्व प्रती प्राज्ञ पाठशाळेत पडून असतील. पुस्तक प्रसिद्ध होऊनही आता आठ वर्षे झाली आहेत. पण तरीही या पुस्तकातील विचार ताजे आणि नवे आहेत. किंबहुना जोपर्यंत महाराष्ट्रातील आणि भारतातील दुष्काळ कायमचा हटत नाही, तोपर्यंत हे विचार विचारात घेणे तरी अगत्याचे आहे. भारतातील शेतीसुधारणेचे सारे प्रयत्न चुकीच्या मार्गाने चाललेले आहेत, खोटया समजुतींवर आणि खोटया माहितीवर आधारलेले आहेत, असा दाभोळकरांचा दावा आहे. भारतातील दुष्काळ हा एक आर्थिक आजार आहे, ते एक आर्थिक दुखणे आहे, हे लेखकाच्या विचारांचे सूत्र आहे. दुष्काळ टाळावयाचा असेल तर प्रत्येकाने दोन घास जास्त खाल्ले पाहिजेत हे लेखकाला सांगावयाचे आहे.

## प्रबंधाची मांडणी

आपण केवढे वेगळे आणि प्रक्षोभक विचार मांडतो आहोत याची या लेखकाला कायम जाणीव आहे. पुस्तकाची आणि विचारांची मांडणीच त्याने तशी उलटया प्रकारे केलेली आहे. 'आडमुठा शेतकरी', 'पाणीपुरवठा', 'खते', 'सामुदायिक शेती', 'पाश्चात्य व भारतीय शेती' या प्रत्येक प्रकरणात लेखकाने प्रथम प्रचलित विचार नीटपणे समजावून दिले आहेत आणि नंतर भरभक्कम आकडेवारीने आणि इतर पुराव्याने ते विचार खोडून काढले आहेत. प्रत्येक प्रकरण वाचून झाल्यावर प्रचलित विचार चुकीचे आहेत हे लेखकाने आपणास पटवून दिलेले असते. पण लेखक आपणाला कोणत्या उपाययोजनेकडे नेतो आहे, हे मात्र आपल्या लक्षात येत नाही. प्रबंधाच्या शेवटी आपणाला हा सारा उलगडा होतो. तसे सांगावयाचे तर प्रबंधाची मांडणी रहस्यकथेसारखी आहे. शेवटच्या प्रकरणात आपणाला आपला खरा शत्रू समजतो. आपल्यासमोर दुष्काळ टाळण्याचा तेवढा एकच मार्ग आहे हे आपण मान्य करतो.

प्रबंधाची सुरुवात लेखकाने महाराष्ट्रातल्या इतिहासाच्या व भूगोलाच्या समालोचनाने केलेली आहे. यानंतर हिंदुस्थानच्या इतिहासातील तेराव्या शतकापासूनचे

सारे ज्ञान दुष्काळ त्यान नोंदवलेले आहेत. पण ही नुसती जंत्री नाही, तर ते प्रकरण म्हणजे एक ललित लेख आहे. या दुष्काळाच्या जंत्रीवर लेखकाने केलेली ही मल्लीनाथी पहा.

" देवगिरीच्या किल्ल्यातील रामदेवराव यादवांच्या कोठारात धान्याच्या पोत्यांच्या जागी मिठाची पोती निघाल्यापासून महाराष्ट्र जीवनाच्या दुधाची दुष्काळाच्या मिठाने वारंवार नासाडी केलेली आढळते. महाराष्ट्रावरील इस्लामी सत्तेच्या काळातील दुर्गादेवीचा १२ वर्षांचा दुष्काळ प्रसिद्धच आहे. पुण्यप्रतापी शिवरायाने महाराष्ट्राचे आनंदवनभुवन करण्याच्या वेळेपर्यंत महाराष्ट्रात दुष्काळाची गस्त फिरल्याच्या खाणाखुणा तत्कालीन वाङमयात सापडतात. स्वराज्यस्थापनेच्या सुमारास पडलेल्या दुष्काळाची नोंद तुकाराममहाराजांनी केलेली आहे. पण त्यानंतर दुष्काळाने महाराष्ट्रातून जे काळे केले ते तत्कालीन जगातील सर्वांत श्रेष्ठ असा सम्राट आपल्या सर्व शक्ती एकवटून महाराष्ट्रात धुडगूस घालत असतानाही महाराष्ट्रात पाऊल टाकण्याची दुष्काळाची छाती झाली नाही. पुढे इंग्रज-मराठयांच्या युद्धात दारूगोळयाच्या पोत्याच्या जागी धान्याची पोती निघून मराठयांचे स्वराज्य लयाला जाताच त्या स्वराज्याबरोबरच धान्याने पण देशातून काळे करण्यास सुरुवात केली व इंग्रजी राज्याबरोबर दुष्काळाने पण महाराष्ट्रात पाऊल टाकले"...... Geography of Starvation या पुस्तकात Jone De Casiro या सारख्या जागतिक तज्ज्ञाने म्हटल्याप्रमाणे 'बुभुक्षित इंग्रज बनियांच्या हस्तक्षेपामुळे हिंदुस्थानातील औद्योगिक क्रांती मुळातच उखडली गेली व हिंदुस्थानात मध्ययुगीन अर्थव्यवस्था व कायमची उपासमार लादली गेली–'...... अतिवृष्टी व अनावृष्टी हे दोन्ही पावसाच्या लहरीपणाचे नमुने आहेत. पण वरुणाला प्रसन्न करण्यासाठी यज्ञात Carbohydrates जाळून हवेतील कार्बनकणांचे व $Co_2$ चे प्रमाण वाढविण्याच्या प्राचीन आर्यांच्या उपायापासून तो $Co_2$ गोठवून त्या गोठवलेल्या ड्रायआईसच्या कणांचा मारा ढगांवर करण्याच्या अद्ययावत् उपायापर्यंत कोणत्याही उपायाने पावसावर हुकमी नियंत्रण ठेवणे अजून माणसाला शक्य झालेले नाही. अर्थात 'जे टाळता येत नाही त्याला तोंड दिलेच पाहिजे,' या नियमाने पावसाचा लहरीपणा अपरिहार्य समजूनच आपल्या दुष्काळ नियंत्रणाच्या योजना आखल्या पाहिजेत ...... आणि निसर्गक्रमाने दर पाच वर्षांनी एक वर्ष अवर्षण पडणारच. त्या अवर्षणाचे जर दुष्काळात रूपांतर व्हावयाचे नसेल तर त्या सालची बेगमी बिगर दुष्काळी हंगामातच करून ठेवणे आवश्यक आहे. सुदैवाने पाच वर्षांत अवर्षणाचे जसे एक वर्ष आहे तसेच उत्कृष्ट पावसाचे पण एक वर्ष निसर्गाने महाराष्ट्राला दिले आहे. या वर्षी दुष्काळाला पुरून उरेल इतके भरघोस पीक महाराष्ट्रातील सुपीक जमिनीतून निघू शकते. दुष्काळी विजापूर जिल्ह्यातील 'पिकवील डोण तर खाईल कोण' ही म्हण या संदर्भात लक्षात येते. अशा प्रकारे जादा पिकणारे धान्य दुष्काळासाठी

पेवात ठेवण्याचे शास्त्र महाराष्ट्रीय किसानाला फार चांगले माहीत आहे. पूर्वजांनी बांधलेली ही भुयारी पेवे महाराष्ट्रात अजूनही सुस्थितीत आहेत. ...... आणि म्हणूनच ज्ञात इतिहासातील सर्वांत मोठा म्हणून ज्याचा उल्लेख होतो, त्या दोजीबारा दुष्काळाच्या वेळी स्वराज्याच्या सुबत्तेत लावण्या-तमाशांत मश्गुल होणारा महाराष्ट्र इंग्रजी अंमलात दुष्काळाचे कायमचे हेडक्वार्टर का बनला ? आणि आज ५२–५३ साली पडलेला दुष्काळ इंग्रजी अंमलाचाच वारसा सांगतो काय, याचा शोध आपण घेणार आहोत."

## आडमुठा शेतकरी आणि मागासलेल्या पद्धती

या अशा प्रस्तावनेनंतर लेखक एकेका गोष्टीकडे वळतो. यातील प्रत्येक प्रकरणाचा उल्लेख करणे अर्थातच गैरसोयीचे आहे. त्यासाठी प्रत्येक जिज्ञासूने हे पुस्तक मुळातूनच नजरेखालून घातले पाहिजे. पण लेखकाच्या विचारांचे नवेपण समजण्यासाठी काही गोष्टींचा उल्लेख करणे जरूर आहे. भारतीय शेतकरी अज्ञानी आहे. आडमुठा आहे. तो काही नवे शिकावयास तयार नाही. आपली भारतीय शेतीची पद्धत कुचकामी आहे, असे चालू मतप्रवाह आपण नेहमीच ऐकतो. पण हे सारे म्हणणे वेडगळपणाचे वाटते. लेखकाने प्रथम यावाबत जागतिक निःपक्षपाती तज्ज्ञांचे अहवाल दिलेले आहेत त्यानंतर स्वतःची मते दिलेली आहेत.

... Famive Commission ला केलेल्या रिपोर्टमध्ये दुष्काळी रत्नागिरी जिल्ह्याबद्दल एका साहेबाने केलेला रिपोर्ट असा की ...... " Southern Konkan has nothing to learn from us or American in rice cultivation." तर शेतीशास्त्रज्ञ सर जॉन रसेल म्हणतो, "जगातील कोणत्याही किसानाच्या तुलनेने भारतीय किसान बरोबरीचा ठरेल." एका प्रख्यात कमिशनसमोर साक्ष देताना सर एडवर्डने नमूद केले आहे की, "हिंदी शेतकऱ्यापेक्षा जर आपण एका बाबतीत वरचढ असलो तर तो आपल्यापेक्षा शंभर बाबतीत वरचढ असतो." डॉ. व्होलकर्ट म्हणतात, "शेती करण्याच्या सर्वसामान्य पद्धतींचा विचार केला तर भारतीय शेतीमध्ये तणाचा नायनाट करून जमीन साफ ठेवणे स्वतःच्या जमिनीची व तिच्या घटकांची पुरेपूर माहिती असणे, पेरणी व कापणीच्या वेळांबाबत अचूक अंदाज असणे, वगैरे बाबतीत भारतीय शेतीपेक्षा पुढारलेली शेती कुठेही आढळू शकणार नाही. आणि तेसुद्धा उत्कृष्ट शेतकऱ्यांच्याबाबत नव्हे तर अगदी सर्वसामान्य शेतकऱ्यांच्या बाबतीत !......आणि 'India need not starve' या पुस्तकात मिचेल ब्राऊननी म्हटलंय " Could the Indian farmers have been given as fair a deal as, say, his brothers and cousins working in the cotton mills of Bombay and Ahmedabad there would have been little need to launch a grow more food

campaign" [ भारतीय शेतकऱ्याला जरी फक्त गिरणी मजुराइतके पैसे मिळाले तरी भारतात कधीच दुष्काळ पडणार नाही.]

पण अर्थातच फक्त साहेब काय म्हणतो हे सांगून लेखक थांबलेला नाही. भारतीय शेतकरी अज्ञानी व आडमुठा नाही या विधानाचे स्पष्टीकरण करण्यासाठी त्यांनी महाराष्ट्राच्या इतिहासाचापण मागोवा घेतलेला आहे. याबाबत लेखकाने केलेले विवेचन मुळातच पाहण्यासारखे आहे. लेखक म्हणतो, "रानटी शकांच्या हल्ल्याला पायबंद घालणारा शालिवाहन महाराष्ट्रातील कुंभाराच्या पोटी जन्माला आला. आणि इस्लामी सत्तेच्या पायगुणाने महाराष्ट्रात दुष्काळाने ठाण मांडताच तिचे उच्चाटन करणारा शककर्ता शिवाजी एका किसानाचा पणतू होता. त्याचे सैनिक आणि सरदार तर महाराष्ट्रीयन किसानच होते. फार काय सर्व सनातनीपणाचे आगर असलेल्या धर्मसत्तेला मोडीत घालून तिच्या जागी नवयुगाच्या धर्माची स्थापना करण्याची जरुरी पडताच भागवतपंथीय संतांनी अगर अर्वाचीन सुधारकांनीही केलेले कार्य अजून शिळे झालेले नाही......शेती सुधारणेबाबतच बोलायचे तर आर्थिक दृष्ट्या किफायतशीर असलेल्या सर्व सुधारणा महाराष्ट्रीय किसान तत्परतेने उचलीत असल्याचे आढळून येईल. भुईमूग, तंबाखू वगैरेंसारखी व्यापारी पिके किफायतशीर ठरत असल्यानेच परंपरागत धान्य पिकाच्याऐवजी या परकीय पिकांची लागवड अत्यंत तत्परतेने महाराष्ट्रीय किसानाने केली ही गोष्ट त्याच्या सनातनी आणि अडाणीपणाचीच द्योतक समजायची काय ?......अडाणी समजला जाणारा असा हा भारतीय किसान एकरी सरासरी किमान उत्पन्न असणाऱ्या भारतीय शेतीतून दुष्काळी मद्रासमधील शेतकऱ्याप्रमाणे स्वतःच्या अक्कलहुषारीने एकरी बारा हजार पौंड भात पिकवून भाताच्या जास्तीत जास्त उत्पादनाचे साडेपाच हजार पौंडाचे रेकॉर्ड मोडू शकतो, अगर कोल्हापूरच्या पाटलाप्रमाणे महाराष्ट्रातील जिराईत जमिनीत एकरी ६५०० पौंड ज्वारीचा जागतिक उच्चांक आपल्या अक्कलहुषारीने निर्माण करून 'कृषिपंडित' ही पदवी मिळवू शकतो. ही उदाहरणे '–आमच्या शेतकऱ्याचे शेती करण्याचे हजारो वर्षांचे जुनेपुराणे ज्ञान आज टाकाऊ झाले आहे' या विधानाला खोडून काढीत नाहीत काय ?

## आणखी काही प्रकरणे

अशा या वेगळ्या उफराट्या विचारांनंतर लेखक अधिक खोलात शिरतो. 'सुधारलेली बियाणे,' 'खते,' 'पाणीपुरवठा,' 'दलाली खंड व कर्ज' 'सामुदायिक शेती'' ही यातील महत्त्वाची प्रकरणे. यातील प्रत्येक प्रकरणातही लेखकाने असेच जगावेगळे विचार मांडले आहेत. पुन्हा आपल्या मुद्यांच्या स्पष्टीकरणासाठी भरपूर पुरावा आणि विवरण आहेच. आपल्या सध्याच्या शेती पद्धतीत, समाजरचनत तसे काही चूक नाही हे लेखक आपणाला यात पटवून देत आहे.

भारतात लहान लहान तुकड्यांवर शेती करावी लागते. सलग अशी सामुदायिक शेती नसते. त्यामुळे उत्पन्न कमी येते या विधानाचा लेखकाने समूळ पायाच उखडून काढला आहे. जवळजवळ पंधरा पाने या विवेचनावर त्याने खर्च केलेली आहेत. हे प्रकरण वाचताना तर एखादी बौद्धिक कुस्ती पाहिल्याचे वाचकाला समाधान मिळते. एखादे प्रचलीत मत, त्यावर उत्तर, पुन्हा प्रतिप्रश्न असे या प्रकरणाचे स्वरूप आहे. या प्रकरणात शेवटी लेखक म्हणतो : १. एकरी सरासरीने भारताच्या तिपटीने भात पिकविणाऱ्या जपानमधील भात खाचराचा आकार पाच चौरस रॉड एवढाच आहे. २. एकरी जास्तीत जास्त उत्पन्न काढण्यासाठी कमीत कमी क्षेत्रावर जास्तीत जास्त श्रम व शक्ती एकवटणे आवश्यक असते. ३. व्यापारी पद्धतीने तुम्ही शेतीवर ट्रॅक्टर वापरणार असाल तर तीन एकरांपेक्षा जास्त शेती एका तळी असणे किफायतशीर नाही. ४. विखुरलेल्या तुकड्यांमुळे शेतकऱ्याला मिळणारा सर्वांत मोठा फायदा म्हणजे बऱ्याच वेळा पावसाच्या अनियमितपणावर त्याचा विम्यासारखा उपयोग होतो.

## पाश्चात्य शेती व भारतीय शेती

लेखकाचे हे सारे विचार ऐकल्यावर वाचकाला साहजिकच प्रश्न पडतो, की हे सारे जर खरे तर मग भारतात दुष्काळ का ? भारतीय शेतकरी जर पुढारलेला आहे तर पाश्चात्य शेतकरी आमच्याहून अनेक पट अधिक असे सरासरी उत्पन्न का घेतो ? पण पाश्चात्य शेती व भारतीय शेती यावरचे लेखकाचे विवेचन अक्षरशः हादरा देणारे आहे. पाश्चात्य अर्थशास्त्रज्ञांनी लिहिलेली पुस्तके आपण वाचतो. त्यात आपणास आकडेवारी पाहावयास मिळते. आकडेवारीत नमूद केलेले असते, भारतीय किसान एकरी ८५ पौंड कपाशीचा धागा पिकवितो तर अमेरिकन किसान एकरी १६९ पौंड कपाशीचा धागा पिकवितो. भारतीय किसान सरासरीने एकरी ६३६ पौंड गहू पिकवत असून युरोपियन किसान एकरी सरासरीने ११४६ पौंड गहू पिकवतो. पण ही आकडेवारी बरोबर घेऊन आपण जर प्रत्यक्ष शेतावर जाऊन पोचलो तर ही आकडेवारी बरोबर उलटी ठरते. ही सरासरी आकडेवारीची तुलना, चुकीच्या पायावर झालेली आपणास आढळून येते. शेतीत एक महत्त्वाचा सिद्धांत आहे. एखादी जमीन तुम्ही एक दोन वर्षे कुरणाखाली टाकलीत तर नंतर ती जमीन नांगरल्यावर पहिल्या वर्षी भरपूर पिकते. अमेरिकन किसान नेमके हे करतो. समजा, जर एक अमेरिकन शेतकरी या 'नॉर्थफोक फॉर कोर्स रोटेशन' या पद्धतीने चार एकर जमिनीत शेती करत आहे. त्या वेळी तो फक्त एक एकर जमिनीत गहू पिकवील व १/४ जमिनीत वैरणीसाठी टर्निप, १/४ क्षेत्रात वैरणीसाठी ओट व १/४ क्षेत्रात वैरणीसाठी गवत वाढवील. अशाप्रकारे त्याच्या जमिनीपैकी ३/४ भाग कुरणाखाली असेल. पुढील वर्षी या ३/४ जमिनीपैकी एका भागात तो गहू पिकवील आणि गेल्या वर्षी ज्या भागात गहू पिकला तो

भाग आता कुरणाखाली जाईल. म्हणजे आता चार वर्षांनी तो भाग पुन्हा गहू पिकवण्यासाठी वापरला जाईल व हे चक्र असे सारखे सुरू असेल. याउलट या वेळी महाराष्ट्रीयन किसान जर त्याची शेती चार एकर असेल तर काय करील ? तो १/२ जमिनीत गहू व १/२ जमिनीत ज्वारी घेईल. ही जमीनपण तो फेरपालटाने वापरील. म्हणजे तुम्ही जर आता शेतकी पद्धतीने सरासरी मांडलीत तर ती अशी असेल :

## एकूण शेती चार एकरांतील

| | शेती भारतीय आकडे पौंडात | शेती पाश्चात्य आकडे पौंडात |
|---|---|---|
| गहू | ११७२ | ११४६ |
| ओट | — | १६०० |
| ज्वारी | १२०० | — |
| ज्वारी (कडबा) | ३००० | — |
| गवत (हे) | — | ३००० |
| टर्निप | — | ३५००० |
| ज्वारी (हिरवी वैरण) | ३५००० | — |

म्हणजे मागासलेला (!) भारतीय शेतकरी सरासरीने कमी उत्पन्न घेत नाही. अमेरिकेतील ' नॉर्थफोक फॉर कोर्स रोटेशन ' ही पद्धत आपण वापरली तर प्रत्यक्ष शेतीखालील जमीन बरीच कमी होणार असल्याने आपले सरासरी उत्पन्न वाढल्याचा वरवर भास झाला तरी एकूण उत्पादन मात्र कमी होईल.

## कारणमीमांसा आणि उपाययोजना

प्रबंधाचा या नंतरचा भाग, भारतीय दुष्काळाचे खरे कारण देण्यात आणि त्यावर उपाययोजना सुचविण्यात खर्च केलेला आहे. भारतीय शेती व्यवसायात ' किमान उत्पादनाचे अर्थशास्त्र ' (Law of diminishing returns) आज थैमान घालीत आहे असा लेखकाचा दावा आहे. ' किमान उत्पादनाचे अर्थशास्त्र ' या प्रकरणाची सुरुवातच मुळी एका मुलाखतीपासून होते. ती मुलाखत आहे ज्वारीच्या उत्पादनाबाबतचा जागतिक उच्चांक निर्माण करणाऱ्या कृषिपंडित पाटील यांची. या मुलाखतीत श्री. पाटलांनी आपल्या विक्रमाची किमया कोणताही आडपडदा न ठेवता मोकळेपणाने सांगितली आहे. दाभोळकरांनी ही मुलाखत व्यापारी दृष्टीने टिपलेली आहे. पाटलांनी न सांगितलेल्या पण सांगावयास हव्या होत्या अशाही काही गोष्टींची त्यांनी नोंद घेतलेली आहे. पाटलांच्या या शेतीचा एखाद्या व्यापाऱ्याच्या जमाखर्चाच्या वहीप्रमाणे त्यांनी हिशेब दिलेला आहे. शेती हा जर धंदा असेल तर या साऱ्या गोष्टींची नोंद घेणे अगत्याचे आहे. घरच्या माणसांची व

बैलांची मजुरी, खर्चावरील व्याज, दुष्काळाच्या वर्षासाठी तरतूद, देखरेख करणाऱ्या घरच्या माणसांची मजुरी सारे यात नोंदवलेले आहे. शेतीचा हिशेब कशा प्रकारे ठेवावयास हवा हे समजण्यासाठी तरी प्रत्येकाने हे प्रकरण एकदा जरूर अभ्यासले पाहिजे. यानंतर लेखकाने आणखी एक मुलाखत नोंदवलेली आहे. आपल्या शेतीवर किमान उत्पन्न घेणाऱ्या सर्वसामान्य भारतीय शेतकऱ्याच्या जमाखर्चाची नोंद त्यांनी केलेली आहे. या दोन मुलाखती वाचल्यावर, हे दोन हिशेब बारकाईने नजरेखालून घातल्यावर एक गोष्ट लक्षात येते. कृषिपंडित पाटलांच्या पद्धतीने शेती करणे आतबट्ट्याचे आहे. एकरी जितके कमी उत्पादन घ्याल तेवढा आज शेतकऱ्याला अधिक नफा सुटतो आहे; किंबहुना अधिक नफा मिळविण्यासाठी जेवढे कमी उत्पादन घ्यावयास हवे तेवढे कमी उत्पादन घेऊन भारतीय शेतकरी आज अगतिकपणे उभा आहे. थोड्या वेगळ्या शब्दांत मिचेल ब्राऊनने म्हटलेले, " Could the Indian farmers have been given as fair a deal as, say, his brothers and cousins working in the cotton mills of Bombay and Ahmedabad there would be little need to launch a grow more food campaign " हे शब्द अक्षरश: खरे आहेत.

——खरोखरच परिस्थिती फार केविलवाणी आहे. शतकाशतकांचे व्यवहारज्ञान बरोबर घेऊन चालू जगात उभा असलेला भारतीय शेतकरी आज अगतिक बनला आहे. त्याची साऱ्या बाजूंनी कोंडी झालेली आहे. देशात एखादा नवा कारखाना सुरू केला तर परदेशांतून येणाऱ्या मालावर आपण बंदी घालतो. किमानपक्षी त्याच्यावर भारी कर बसवून नव्या भारतीय कारखान्याला आपण संरक्षण देतो. आणि शेतीच्याबाबत काय घडते ? परदेशांतून आणलेले धान्य शेतकऱ्यांसमोर स्पर्धेसाठी बाजारात असते. हे धान्य पदरचे पैसे घालून स्वस्त विकण्याचा हट्ट असतो. या परिस्थितीत जगातला कोणताही धंदा कधी वाढू शकणार नाही.

भारतीय शेतकऱ्यासमोरची कोंडी फुटू शकेल काय ? —भारतीय शेती या चक्रव्यूहातून बाहेर येऊन स्वत:च्या पायावर खंबीरपणे उभी राहील का ? —या साऱ्या प्रश्नांची उत्तरे आपणास कदाचित फार सुलभपणे मिळू शकतील. पण मग एका नव्या मार्गाने आपणास विचार करावा लागेल. शेती हा एक धंदा आहे हे तर कधीच नजरेआड करता येणार नाही. तुम्हा आम्हाला त्यावर एक मार्ग सुचतो. शेती उत्पादनाला भरमसाट किंमत द्या, हा आपणाला वरवर सुचणारा मार्ग आहे. पण हा उपाय आपण अंमलात आणू शकत नाही; कारण भारतासारख्या शेतीप्रधान देशात लोकांच्या खिशात पैसे जातात ते अखेर शेतीच्या उत्पादनातूनच. हे एक दुष्टचक्र आहे. लेखक म्हणतो, भोवऱ्यात सापडल्यावर त्याच्या एकाच कडेवर कितीही नेटाने प्रयत्न केला तर त्यातून सुटका न होता पोहण्याची शक्ती मात्र

क्षीण होते. परंतु भोवऱ्याच्या तळाला जाऊन खालून पोहत गेल्यास अल्प श्रमात त्यातून सुटका होऊ शकते.

लेखकाच्या मते दारिद्र्याच्या भोवऱ्यातून देशाची सुटका करण्यासाठी आपणास असाच काही मार्ग आखावयाचा आहे. अर्थात त्यासाठी लेखकाने सुचविलेला उपाय मी मुद्दामच येथे देत नाही, कारण मग त्यामुळे या विषयाची आस्था असलेले वाचक मूळ पुस्तकास हात न लावण्याची शक्यता आहे. लेखकाचे विचार समजावून सांगताना त्यात काही गफलत होऊन मी काही चुकीचे विचार सांगण्याचाही धोका आहे. एखादा संपूर्ण नवा विचार समजावून घेताना वा देताना अशी गफलत अनेकदा नकळत होऊ शकते. त्यासाठी या ज्वलंत प्रश्नाची आस्था असलेल्यांनी हे पुस्तक मुळातच वाचावे.

चारुदत्त दाभोळकरांचे विचार बरोबर आहेत, असे मला अर्थातच म्हणावयाचे नाही. त्या विषयात माझा तसा काही अधिकारही नाही. पण हे विचार ज्यांना पटत नाहीत अशा कोणा अधिकारी तज्ज्ञांनी पुराव्याने दाभोळकरांच्या विचारांतील कमकुवतपणा दाखविला नाही तर ते विचार असेच राहणार आहेत. माझी या पुस्तकाच्या अनुषंगाने फक्त एकच तक्रार आहे ती ही की, असे विचार सर्वसामान्य वाचकांपर्यंत पोचवले जात नाहीत. अधिकारी तज्ज्ञ लोक तर अशा विषयाकडे दुर्लक्ष करतात. महाराष्ट्रातील साऱ्या वृत्तपत्रांकडे हे पुस्तक अभिप्रायार्थ गेल्यावर त्यावर अभिप्रायही येऊ नये हे कशाचे द्योतक आहे?—महाराष्ट्राच्या वैचारिक जीवनात आज एक विलक्षण मरगळ पसरलेली आहे. कोणताही नवा विचार समजावून घेण्याची कोणाला काही जरुरीच वाटत नाही. हे पुस्तक काही एकमेव उदाहरण नाही. अन्नस्वतंत्रता संचलनाचे खंडन वा समर्थन करून काही विचारमंथन करण्याची कोणाला फारशी आवश्यकता वाटली नाही. गारगोटीच्या ‘स्वाश्रय’सारखी एक सर्वस्वी वेगळी योजना, शास्त्रीय नियमांवर आणि निकषांवर कोणी घासून पुसून घेतली नाही. इतकेच कशाला, गेल्या वर्षी प्रसिद्ध झालेला राममूर्तींचा अहवाल घ्या. बंगाल आणि महाराष्ट्र यांना नोकऱ्यांत फार मोठा वाटा मिळतो असा त्यात साधार पुरावा आहे. केरळ-आसाम यांच्यावर अन्याय होतो असा त्यात दावा आहे. प्रांतीय चळवळी या प्रांतात उभ्या राहतील आणि अखेर देशाचे तुकडे पडतील असे त्यात भाकीत आहे. नोकरीत महाराष्ट्रावर अन्याय होतो म्हणून संतापून ओरडणाऱ्या एकाही मराठी वृत्तपत्राने अजून या अहवालाचे खंडन केलेले नाही. एखादा नवा विचार साधार टीकेने हतप्रभ करण्याऐवजी तो उपेक्षेने मारण्याची महाराष्ट्रातील ही नवी प्रथा अखेर भयावह ठरेल, इतकेच मला नम्रपणे सुचवावयाचे आहे. ○

**[ महाराष्ट्रातील दुष्काळ व त्यावरील उपाययोजना : लेखक : चा. अ. दाभोळकर : प्रकाशक : प्राज्ञ पाठशाळा, वाई : पृष्ठे १३८ : किंमत २ रु. ]**

# रामाच्या पादुका

द. मा. पुराणिक

वनवासाला निघालेल्या रामचंद्राला परत आणण्यासाठी भरत प्रजाननांसह निघाला. रामचंद्राची भेट घेऊन त्याने खूप विनवण्या केल्या. उपवास करून प्राणत्याग करण्याची धमकी दिली. पण उपवासाचा शेवट प्राण-त्यागात कधीच होत नसतो हे त्या सर्वज्ञ रामाला पुरते ठाऊक होते. त्यामुळे याही उपायाचा उपयोग झाला नाही. शेवटी निरुपाय होऊन भरत म्हणाला,

"ठीक आहे. रामा, मी परत जातो. तुझ्या आज्ञेप्रमाणे काळजीवाहू सरकार या नात्यानं राज्यकारभार चालवतो. पण कागदो-पत्री नाव तुझे राहील. कुलमुखत्यार म्हणून फक्त मी काम पाहीन."

श्रीराम हसून म्हणाले,

"कसेही कर बावा. गाडा चालव म्हणजे झालं. लोकांना सुखसमाधान दे."

"एका अटीवर हे सगळं मान्य—"

"अट ? कसली अट ?"

"या राज्याचे धनी आपण आहात हे पुढं पुढं मी कदाचित विसरून जाण्याचा संभव आहे." भरत विचारमग्न होऊन बोलला,

# आणि भरताची परंपरा

" " " " " " " " " " " " " " "

" नाही म्हटलं तरी खुर्चीचा गुण काही निराळाच असतो ! चौदा वर्षांचा प्रश्न आहे. तीन निवडणुका होऊन जातील तेवढ्यात. मग गादी सोडणं एखाद्या वेळी जिवावर येईल-- "

" बरं मग ?"

" तुझ्या हक्काचं काहीतरी टोकन मला दे. म्हणजे ते मी गादीवर ठेवून कारभार करीन. असं का करीनास ? तुझ्या या खडावा मला दे. त्याच सिंहासनावर ठेवून मी हा शकट चालवीन. तुझ्या पादुकांकडं पाहिलं म्हणजे हे सिंहासन तुझं आहे हे सारखं माझ्या ध्यानात राहील. पाप वगैरे मनात येणार नाही—"

भरताची ही बंधुभक्ती आणि प्रांजळपणा पाहून श्रीरामांना अगदी गहिवरून आले. खरे म्हणजे पादुकांची त्यांना त्या क्षणी फार गरज होती. शिवाय कधी नव्हे त्या या लाकडी पादुका त्यांच्या पायाला फिट्ट बसत होत्या. त्या नुकत्याच बनवलेल्या होत्या. म्हणजे तशा त्या नव्याच होत्या. शिवाय डिझाईनही त्याचे अगदी लेटेस्ट होते. म्हणून पादुका देणे त्यांच्या अगदी जिवावर आले. पण भरताचा हट्ट त्यांना मोडवेना. लहानशा गोष्टीसाठी आपल्या भावाला दुखवणे बरे नव्हे.

श्रीरामांनी विचार करून आपल्या पादुका अखेर भरताला देऊन टाकल्या. त्या मस्तकी धरून भरत राजधानीस परत आला. सिंहासनावर त्यांची प्रतिष्ठापना करून भरताचा राज्यकारभार सुरू झाला.

राजा दशरथाचा मृत्यू झाला असला तरी त्याचे पुढचे सगळे विधी व्हायचेच होते. राज्यात एक मासपर्यंत दुखवटा पाळण्यात आला. दशरथाच्या अस्थी आणि राख गोळा करून निरनिराळ्या कलशांत भरून ठेवण्यात आली होती. ती निरनिराळ्या तीर्थांच्या गावी पाठवण्यात येऊन कलशांची मिरवणूक काढण्यात आली व त्यांचे विधिपूर्वक विसर्जन करण्यात आले. (तत्पूर्वी हे कलश दर्शनासाठी एकेक

दिवस सरकारी कचेऱ्यांत ठेवण्यात आले होतेच. लोक दर्शनाला येतील असाही बंदोबस्त करण्यात आला होता. असो.) मग दशरथाच्या नावाने भरताने एक निधी उभारला. त्यातून अयोध्या विद्यापीठात 'दशरथ चेअर' या नावाचे एक अभ्यासनही पुत्रकामेष्टी यज्ञाच्या अभ्यासासाठी निर्माण करण्यात आले. दशरथ महाराजांचा एक भव्य पुतळाही एका विस्तीर्ण चौकात उभारण्यात आला.

भरताने अशा अनेक चांगल्या गोष्टी केल्या. नियमाने रोज तो सिंहासनावरील पादुकांची पूजा करून राजसभेच्या कामकाजास प्रारंभ करी. भरताची पादुकांविषयीची ही निष्ठा पाहून एक दिवस सुमंतानेही अशाच पादुका बनवून घेतल्या आणि आपल्या घरी त्यांची पूजा सुरू केली. सुमंताचे पाहून इतर मंत्रीगणांनी त्याचे अनुकरण केले. हळूहळू घरोघर रामाच्या पादुका दिसू लागल्या. जिकडे तिकडे सकाळी घरोघर रामाच्या पादुकांची पूजा होऊ लागली. मग कुठे काकडारती, कुठे सायंप्रार्थना, कुठे प्रवचन, कुठे परिसंवाद, या सगळ्या गोष्टी पादुकापूजेत समाविष्ट झाल्या. चौदा वर्षांत हा पादुका-संप्रदाय भलताच वाढला. इतका की तो एक स्वतंत्र व्यवसायच झाला. 'येथे श्रीरामाच्या पादुका मिळतील' अशा पाट्या लावलेली दुकाने अयोध्येच्या राजमार्गावर जिकडेतिकडे दिसू लागली.

चौदा वर्षांनी श्रीराम जानकी-लक्ष्मणासह अयोध्येस परत आले!

चौदा वर्षांनी ते अयोध्यानगरी प्रथमच पाहत होते. त्यांना केवढाले तरी बदल घडून आलेले दिसले. जुने गल्लीबोळ जाऊन त्या ठिकाणी प्रशस्त मार्ग झाले होते. उत्तुंग इमारती डौलाने मिरवीत होत्या. ठिकठिकाणी आकर्षक सजावटीची दुकाने दिसत होती. लहानसहान देवळे खणून काढून रस्ते रुंद करण्यात आले होते. (अल्पसंख्याकांच्या सोयीसाठी त्यांची छोटीमोठी प्रार्थनास्थाने मात्र रस्त्याच्या मध्यावर तशीच काळजीपूर्वक जतन करण्यात आली होती. ते पाहून रामचंद्रांना विशेष समाधान वाटले.) ठिकठिकाणी उद्याने, भेळपुरीच्या गाड्या, नीराविक्रीची केंद्रे इ. नवीन सुधारणा पाहून त्यांचे मन प्रसन्न झाले. उघड्या रथातून हात हालवीत, सर्व नागरिकांचे अभिवादन स्वीकारीत विमानतळावरून ते राजप्रासादाकडे गेले.

पुढचा राज्याभिषेकाचा सोहळा सर्वांना माहीतच आहे. त्याचे वर्णन शब्दांनी काय करणार! या समारंभानिमित्त भरताने फारच थाटमाट केला. दुकाने रात्री नऊ वाजेपर्यंत उघडी ठेवण्याची परवानगी दिली. बाहेरच्या नागरिकांना अयोध्येला येण्यासाठी स्पेशल रथ आणि पालख्या सोडण्याची व्यवस्था केली. जेवणावळीवरील निर्बंध तात्पुरते उठवले. सर्व नोकरवर्गास चौदा महिन्यांचा बोनस वाटला. राजा दशरथाच्या समाधीस पुष्पचक्र वाहून राम सिंहासनारूढ झाले त्या दिवशी सार्वत्रिक सुटी जाहीर करण्यात आली.

श्रीराम सगळ्याच राज्यकारभारावर व सुधारणांवर खूष होते. पण विशेषतः, आपल्या पादुकांची पूजा घरोघर होत आहे ही वार्ता तर त्यांना फारच आश्चर्याची

आणि आनंदाची वाटत होती. रामराज्य सुरू झाल्यावर त्यांनी सर्वांना योग्य त्या प्रमाणात बक्षिसे देऊन त्यांचा गौरव केला. पण आपल्या पादुकांची पूजा करणाऱ्या सामान्य जनांचा गौरव कसा करावा हे त्यांना समजेना. शेवटी त्यांनी त्यांच्या काही प्रतिनिधींना बोलावून आणून आपली काय इच्छा आहे ते सांगा, अशी विचारणा केली. तेव्हा ते लोकप्रतिनिधी म्हणाले,

" महाराज, आपल्या राज्यात तर आम्ही सुखी राहणारच, त्याबद्दल आम्हाला कसलीच शंका नाही. पण आमच्या पुत्रपौत्रांना, वंशजांना पिढयान् पिढया काही कमी पडू नये अशी इच्छा आहे. त्यासाठी काही तरी करा !"


श्रीरामांना ते बोलणे पटले. त्यांनी थोडा वेळ डोळे मिटून विचार केला. मग आपले विशाल नेत्र उघडून ते म्हणाले,

" बंधूंनो, चौदा वर्षं माझ्या पादुका घरोघर नेऊन तुम्ही माझी भक्ती केलीत याचं फळ तुम्हाला मिळालंच पाहिजे. उद्या रामराज्य नाहीसं झालं तरी तुमच्या वंशजांना काही कमी पडू नये ही काळजी मी घेईन."

" पण कशी ?"

" या पादुकांचं महत्त्व असंच कायम ठेवा—" राम गंभीरपणे म्हणाले, " उद्या कलियुग येईल. त्या वेळी सभासंमेलनं, व्याख्यानं, प्रवचनं, कीर्तन-पुराणं यांना ऊत येईल. माझं आख्यान ठिकठिकाणी सांगितलं जाईल. आपल्या वंशजांना मी अशा कार्यक्रमास जाण्याची प्रेरणा देईन. असल्या कार्यक्रमांत मी कधी नसतोच. सभा-संमेलनं, व्याख्यानं, प्रवचनं यांत कधीच ' राम ' असणार नाही. मग आपल्या वंशजांनी करायचं ते एवढंच की, तिथं जमलेल्या लबाड, ढोंगी, मूर्ख लोकांच्या कातडयाच्या पादुका उचलायच्या आणि चालू लागायचं. एवढया भांडवलावर त्यांना पोटापुरतं केव्हाही मिळेल."

आजही ही परंपरा चालूच आहे. कुठल्याही गर्दीच्या कार्यक्रमाच्या वेळी अनेक मूर्खांच्या पादुका बेपत्ता होतात त्याचं कारण हेच ! ' योगक्षेमो वहामि अहं ' हे प्रत्यक्ष प्रभूचं आश्वासन त्या लोकांच्या पाठीशी आहे, हे या मंडळींनी कधीही विसरू नये.



# भिंतीच्या तुंबड्या

सुधाकर गाडे

## ☐ मार्क्सवादाचे इंजेक्शन

लंडनच्या एका डावच्या वर्तमानपत्रात नुकतीच एक जाहिरात झळकली " अराजकवादी डॉक्टर पाहिजे ! " आता बोला ! रोग्याच्या शरीरात माजलेले अराजक नेस्तनाबूद करून तेथे शांतता अन् सुव्यवस्थेचे राज्य स्थापन करणे हे डॉक्टरचे काम आहे, अशी सर्वसाधारण समजूत आहे. पण राजकीय वैद्यकशास्त्रानुसार अराजकवादी डॉक्टरला सर्दी-खोकला अधिक लवकर बरा करता येत असावा असे दिसते. मात्र अराजकवादी डॉक्टर चांगला असला तरी लोकशाहीवादी डॉक्टर वाईट का याचा खुलासा कुठल्याही मेडिकल कॉलेजमध्ये मिळेल असे मला वाटत नाही. ते काहीही असले तरी पूर्वी दाताचे डॉक्टर, डोळ्यांचे डॉक्टर, गुरांचे डॉक्टर असे प्रकार होते. ते बाद ठरवून त्यांच्या ऐवजी अराजकवादी डॉक्टर, लोकशाहीवादी डॉक्टर, भांडवलशाहीवादी डॉक्टर, साम्राज्यवादी डॉक्टर, सांप्रदायिकतावादी डॉक्टर, असे प्रकार पाडले पाहिजेत. नाहीतरी चीनमधले माओवादी डॉक्टर पेशंटला गुंगीचे औषध द्यायच्याऐवजी त्याच्या उशाशी माओचे विचार वाचतात असे वर्तमानपत्रात आले आहे. तेव्हा अराजकवादी डॉक्टरने एखाद्या सीरियस रोग्याला मार्क्सवादाचे इंजेक्शन दिले तर नवल नाही. त्याच्या उलट लोकशाहीवादी डॉक्टर डांग्या खोकल्यावर घटनात्मक गोळ्या देईल, तर गांधीवादी डॉक्टर एखादे ऑपरेशन आहसक सुरीने करील. भांडवलवादी डॉक्टर म्हणेल, पडसे झाले असेल तर मुक्त-व्यवसायाचे मलम छातीवर चोळणे उत्तम उलट; नेहरूवादी डॉक्टर म्हणेल, पोट दुखत असल्यास आंतरराष्ट्रीय चूर्णासारखा रामबाण उपाय नाही. तात्पर्य काय, आता जरा जपूनच आजारी पडले पाहिजे. नाहीतर तटस्थतावादी डॉक्टर बोलवायचा की पंचशीलवादी वैद्य बोलवायचा याचा विचार करता करताच कारभार आटपायचा.

## ☐ पॅकबंद अंधार

टोकियोतल्या एका माणसाने शहरातल्या धुरकटलेल्या हवेचे पॅकबंद डबे तीन-तीन रुपयांना विकत मिळतील अशी जाहिरात केली आहे. " सोन्याचा धूर " म्हणावा तर याला. आपल्याकडे निरनिराळ्या शहरांतून अशा निरनिराळ्या

कल्पना पैसे मिळविण्यासाठी उपयोगात आणता येतील. राजधानी दिल्लीचेच उदाहरण घ्यायचे तर कधीकधी चुकून वीजपुरवठा करणारी येथली तथाकथित वीज-पुरवठा कंपनी पॅकबंद अंधार विकू शकेल. मुंबईत तर टोकियोपेक्षा अधिक बुरकटलेली हवा अधिक स्वस्त दरांत मिळू शकेल. कलकत्त्याला निरनिराळ्या आकाराच्या बाटल्यांत पद्धतशीरपणे भरलेले गटारपाणी गंगाजळाच्या भावात मिळू शकेल. रस्त्यावरचा चिखल मात्र हिंदुस्थानातील कोठल्याही गावात विकत मिळणार नाही. कारण तो सर्वत्र इतका मुबलक आहे की कोणीही हवा तेवढा फुकट न्यावा.

## □ मते आणि ( सफाचट ) मिशा

पाकिस्तानातील आगामी निवडणुकीत एक हजार न्हावी संघटितरीत्या भाग घेणार आहेत, अशी बातमी आहे. केस कापणारे न्हावी आणि केसाने गळा कापणारी राजकारणी मंडळी यांच्या युतीने स्थापन झालेल्या या पक्षाचा निवडणूक-जाहीर-नामा कसा असेल बरं ? पहिली गोष्ट म्हणजे त्यांची घोषणा काय असेल हे ओळखणे कोणत्याही गिऱ्हाइकाला कठीण नाही– " आम्हांला मते द्या, नाहीतर बिनपाण्याने हजामत करू !" त्यांचा लोकशाहीवर विश्वास असेल–" दरडोई एक मत आम्हांला मान्य आहे तेव्हा दरडोई एक रुपया हा आमचा रेट तुम्ही मान्य करा. " याच्या जोडीला ते पुढील आश्वासनेही देऊ शकतील– १. केस कापताना आम्ही ' काम चालू तोंड बंद ' असे धोरण ठेवू, २. बोललोच तरी आधी तुमच्या गळ्यावर वस्तरा ठेवून मग तुमचे राजकीय मत विचारण्याची आमची परंपरागत पद्धत आम्ही सोडून देऊ. ३. मिया मूठभर तर दाढीही मूठभर, असे रास्त प्रमाण ठेवू. आता न्हाव्यांनी पक्ष काढला तर सोनार-शिंपी कुलकर्णी-अप्पा यांचे पक्ष का नकोत ? चांभारांचा पक्ष म्हणेल– " आम्हांला निवडून दिलेत तर आमच्या कातड्याचे जोडे करून तुमच्या पायांत घालू. शिंपी म्हणतील– आम्हांला मत दिलेत तर एक नूर आदमी दस नूर कपडा असा फायद्याचा कायदा करू. सोनार म्हणतील– आमचे राज्य झाले तर आम्ही राज्यकारभाराचा दर्जा चौदा कॅरटवरून चोवीस कॅरटवर नेऊ. आणि धोबी म्हणतील सरकारी भ्रष्टाचाराची लक्तरे कितीही ओंगळ असली तरी ती आमच्या राज्यात सफेद धुतली जातील उजळ धुतली जातील, याची गॅरंटी आहे. ○

# एकटी

मधूच्या पैशाचा मोह तिला नव्हता, त्याचं ऐश्वर्यही तिला नको होतं–तिला तहान होती मुलाचा संसार पाहण्याची–नातवंडं मांडीवर खेळवत उरलं सुरलं आयुष्य भरल्या घरात काढण्याची. तथापि नशिबानं दगा दिला. सुनेने सासूकडे पाठ फिरवली आणि लादलेला एकांतवास पदरी आला. हे दुर्दैव वाट्याला आलेल्या मातेची कथा दिग्दर्शक राजा ठाकूर यांनी आपल्या नवीन चित्रपटात सांगितली आहे.

पुत्रमुख पाहण्यापूर्वीच पित्याचे निधन झाले. वैधव्य पदरी येऊनही ती जगली, आणि मधूचा जन्म झाला. माहेरची माणसं बोलवीत होती पण तिनं सासरची सीमा ओलांडली नाही. शिवण–टिपण करून तिनं मुलाला वाढवलं. मधूनंही आईच्या कष्टांचं चीज केलं. शिक्षणाची आघाडी यशस्वीपणे पूर्ण करून मधूने यशस्वी जीवनास सुरुवात केली. योगायोगाने गाठ–भेट झालेल्या प्रियाशी त्यानं लग्न केलं आणि आईच्या सर्व आशा-आकांक्षांवर पाणी पडलं. मधूला प्रिया प्रिय होतीच. पण आईही हवी होती. सासू–सुनेचं पटेना आणि दोघीं-पैकी एकीची निवड करण्याची वेळ आल्यावर त्याने प्रियाच्या बाजूनं कौल दिला. आईला कमी पडलेल्या मायेची कसर मधू पैशाच्या रूपाने भरून काढू लागला. नियमितपणे शंभर रुपये आईकडे रवाना होऊ लागले.

मधू–प्रियाचा संसार फुलू लागला. नातू झाल्याचे वृत्त आजीच्या कानांवर गेले. पण आजीबाई पुणे सोडून जाण्यास राजी होईनात. त्यांची अपेक्षा सुनेनं आणि मुलानं नातवासह आपल्याकडं यावं. चिरंजिवांनी आपण येणार असल्याचे पत्रही पाठवले. तब्येत ढासळत असूनही आजीबाई उत्साहाने खरेदीला लागल्या. सर्वांसाठी खरेदी केली आणि वाट पाहत बसल्या.

इकडे प्रियाने येण्यास स्पष्ट नकार दिला. संतापलेला मधू आयुष्यात प्रथमच स्वतःच्या निर्णयाने वागला. आणि छोकऱ्याला घेऊन पुण्याकडे निघाला.

दिवाळीचा दिवस टळून गेलेला, रात्रीचा दीपोत्सव आणि फटाक्यांची आतषबाजीही संपलेली; पण आजीबाई मात्र नातवाची वाट पाहत बसलेल्या. मध्यरात्री मधू येतो, तो दार उघडे. आई भिंतीला टेकून बसलेली. तसाच घरात जातो. पण उशीर झालेला असतो. अधिक वाट पाहण्याची तयारी नसलेल्या आईनं देह ठेवलेला असतो. परिस्थिती लक्षात आल्यावर एकच आकांत उसळतो. नंतरच्या आवराआवरीत नोटांनी गच्च भरलेला एक डबा मधूच्या हाती येतो. आत एक चिठी असते आईची. मधूने पाठवलेले सर्व पैसे तिनं मधूसाठीच ठेवलेले असतात.

आता माता झालेल्या प्रियाला सासूच्या खडतर आयुष्याची आणि तिच्या मनाला झालेल्या यातनांची कल्पना येते. पण काळ कुणासाठी थांबत नसतो. पूर्ण दुःख भोगून मधूच्या आईची जीवनगाथा संपलेली असते. एवढं अस्सल चलनी ' फिल्मी–एलिमेन्ट ' असलेली कथा वास्तविक जायची दत्ता धर्माधिकारी यांच्याकडे. पण निर्माते चौगुले यांनी ती कामगिरी राजा ठाकूर यांच्यावर सोपवली. आणि असला विषय हाताळण्यात आपण कमी नसल्याचे त्यांनी दाखवून दिले. त्यांच्या दिग्दर्शनात नोंद घेण्यासारखे बारकावे आढळले नसले तरी फारसा उणेपणाही जाणवला नाही. हाती आलेली कथा त्यांनी प्रामाणिकपणे पडद्यावर आणली आहे. सुदैवाने एकापेक्षा एक सरस कलावंत हाताशी मिळाल्याने त्यांचे काम पुष्कळच सुलभ झाले आहे.

चित्रपटावर प्रभुत्व गाजवतात सुलोचनाबाई (आई). अंगचे अभिनयकौशल्य आणि झुकते वय यांमुळे खडतर आयुष्यातून यशस्वी वाटचाल केल्यावर सुखाची अपेक्षा करणाऱ्या आणि हे सुखही मृगजळासमान ठरल्यावर पुन्हा सक्तीने स्वतःला एकमार्गी जीवनात गुंतवणाऱ्या ' आई 'ची व्यक्तिरेखा बाईंनी समर्थपणे उभी केली आहे.

मधूची भूमिका काशिनाथ घाणेकर यांनी मन लावून केली आहे. अखेरच्या काही दृश्यांतून त्यांचा प्रभाव विशेष जाणवतो.

रंगभूमीवरून नुकत्याच पडद्यावर सरकलेल्या इंदूमती पैंगणकर प्रियाच्या भूमिकेत दिसतात सुंदर. त्यांच्या अभिनयाला–विशेषतः संवाद बोलण्याच्या पद्धतीला काहीशी कृत्रीमतेची झालर आहे. चित्रपटांतील भूमिकांचे प्रमाण वाढत गेल्यावर

हा दोष कमी होईल. तमाशा चित्रपटांसाठी जयश्री गडकर आणि सामाजिक चित्रपटांसाठी सीमा–उमांच्या गीतावळचात अडकणाऱ्या मराठी चित्रपट निर्मात्यांचा आणखी एक 'चॉईस' वाढला आहे एवढे मात्र खरे. छोटचा भूमिकेत शरद तळवलकर, कुसूम देशपांडे, सुरेखा (के. ए. अब्बास–फाइंड) व राजा बापट हे कलाकार समाधान देतात.

चित्रपटाची तांत्रिक अंगे समाधानकारक आहेत. छायाचित्रणाच्या दर्जामध्ये सातत्य आहे. विशेष उल्लेख केला पाहिजे तो ध्वनिलेखनाचा. मराठी चित्रपटांचे ध्वनिलेखन सर्वसाधारणपणे प्रेक्षक ठार बहिरे आहेत, अशा समजुतीने केले जाते; किंवा हलक्या आवाजातील कुजबूज ऐकण्याची प्रेक्षकांजवळ विशेष शक्ती आहे, अशा पद्धतीने ध्वनिनियोजन केले जाते. या दोन्ही दोषांपासून "एकटी"ला दूर ठेवण्यात ध्वनिसंयोजक बाळ ठकार यशस्वी झाले आहेत.

श्री. सुधीर फडके यांचे संगीत थिएटरात बऱ्याच दिवसांनी ऐकावयास मिळाले. विषयाला साजेसे पार्श्वसंगीत आणि काही गीतांना आकर्षक चाली देण्यात ते यशस्वी झाले आहेत.

'लिंबलोण उतरू कशी, अससि दूर लांब तू,
इथुनी दृष्ट काढिते निमिष एक थांब तू–'

या गीताचा विशेष उल्लेख केला पाहिजे.

महिलावर्गाचा आश्रय मिळावा अशा पद्धतीने तयार केलेला हा सामाजिक चित्रपट यशोदायी वाटचाल करील असे वाटते. ◻

## अपराधी

नाटचवेडचा पुणेरी प्रेक्षकाला पी. डी. ए. च्या नवीन नाटकांचे अजूनही काही प्रमाणांत आकर्षण वाटते. हौशी नाटचसंस्थांत विशेष स्थान असलेल्या या नाटचसंस्थेने श्री. अनिल जोगळेकर यांचे 'अपराधी' हे कोरे नाटक रंगभूमीवर आणले. नाटककारही घरचाच, आणि दिग्दर्शकही घरचाच असल्याने आणि दोघेही तुलनेने या क्षेत्रात नवखे असल्याने अतिशय मेहनत घेऊन नाटक उभे केल्याचा प्रत्यय 'अपराधी' पाहत असताना आला.

फिरोदिया आणि कंपनीचे दिवाळे वाजते. प्रचंड रकमेची अफरातफर केल्याचा आरोप असलेला धीरज पटेल बेपत्ता असतो. फिरोदिया कंपनीचे दिवाळे वाजल्याने या कंपनीवर अवलंबून असलेल्या अनेक कुटुंबांची धूळधाण उडते. सक्सेना कुटुंब अशा अनेक कुटुंबांपैकी एक. कंपनी बुडाल्याच्या धसक्याने

श्री. सक्सेना आत्महत्या करतात. त्यांची मुलगी मिनू सक्सेना आपल्या वडिलांना जीवनातून उठवणाऱ्या धीरज पटेलवर सूड घेण्याचा निश्चय करते.

सुमित्रादेवी या धनवान स्त्रीच्या सहकार्याने फिरोदिया कंपनीचे डायरेक्टर्स भारत डिस्ट्रिब्यूटर्स ही नवीन कंपनी स्थापन करतात आणि भरपूर यशही मिळवतात. रतनलाल हे या कंपनीचे एक डायरेक्टर. मिनू सक्सेना त्यांच्याकडे चिटणिसाची नोकरी पत्करते. तिची शोधक नजर धीरज पटेल याला शोधण्यात मश्गुल असते. धीरजला नाटकाचे आणि क्रिकेटचे विलक्षण वेड असते. परागंदा झालेला धीरज कधी ना कधी परत भारतात येईल अशी, तिला खात्री असते. त्याच्या आवडी लक्षात ठेवून ती त्याचा शोध घेत राहते. आणि अखेरीस धीरज तिला सापडतो. मोठ्या कौशल्याने मिनू त्याला रतनच्या बंगल्यावर आणवते. भारतात पुन्हा येऊन धीरजने बी. रघुवीर या नावाच्या गृहस्थाबरोबर भागीदारीत व्यवसाय सुरू केलेला असतो. त्याचा हा विश्वासू भागीदार त्याच्याबरोबर असतोच.

हा सर्व झाला कथेचा पूर्वभाग. मिनूने रचलेल्या या चक्रव्यूहातून धीरज निर्दोष असल्याचे सिद्ध करतो आणि मग त्याची खऱ्या गुन्हेगाराचा तपास करण्याची खटपट सुरू होते. मिनूइतकाच धीरजही गुन्हेगार व्यक्ती शोधण्यास उत्सुक असतो. अगदी अनपेक्षित व्यक्ती गुन्हेगार असल्याचे सिद्ध होऊन नाटक ' प्रेक्षकांना दणका ' देऊन संपते.

नाटकाद्वारे श्री. जोगळेकर यांना साधी, सरळ, उत्कंठा वाढवणारी रहस्यपूर्ण कथा सांगावयाची आहे आणि हा मर्यादित हेतू लक्षात घेता श्री. अनिल जोगळेकर यांनी आपल्या या दुसऱ्याच प्रयत्नांत मिळवलेले यश खचितच अभिनंदनीय म्हणावे लागेल. रहस्य जाणून घेण्याची प्रेक्षकांची उत्कंठा ताणून धरण्यात नाटककार यशस्वी झाला आहे. संवादांतून पूर्वकथानकही त्यांनी मोठ्या कौशल्याने सांगितले आहे. फापटपसारा न मांडता विषयाभोवतीच संवाद फिरते ठेवूनही संवादांतील चैतन्य कायम असल्याचे आढळून येते. लेखनातील ' बॅंकिंग 'च्या संदर्भातील तांत्रिक बावीही शक्य तितक्या सोप्या भाषेत—सामान्य प्रेक्षकाला रुचतील अशा पद्धतीने—मांडलेल्या आहेत. अंक संपवण्याच्या ' जागा ' त्यांनी उत्कृष्ट निवडल्या आहेत.

नाटकाचे दिग्दर्शन श्री. जव्वार पटेल यांनी केले आहे. धीरज पटेलची महत्त्वपूर्ण भूमिकाही त्यांनी सफाईदारपणे केली आहे. प्रथमश्रेणीचे कलावंत हाताशी असल्याने, आणि नाट्यविषय फुलवण्याची निश्चित कल्पना असल्याने एक सुबक व नेटका प्रयोग देण्यात दिग्दर्शक यशस्वी झाला आहे.

प्रयोग पाहत असताना एक छोटीशी बाब खटकली, तिचा उल्लेख करतो. अफरातफर करणारा गुन्हेगार शोधताना शांतीलाल बँकेला फोन करतो. त्या वेळी बँका बंद होण्याची वेळ असते. मोठ्या मुष्किलीने आवश्यक ती माहिती मिळते आणि त्यानंतर मिनू सक्सेना भारत डिस्ट्रिब्यूटर्सच्या सर्व डायरेक्टरांच्या बँकांना

फोन करून ' ट्रान्स्फर पेपर्स 'संबंधीची माहिती मिळवते. आणि सर्व बँकांतून आवश्यक ती माहितो तिला मिळतेही. संवादांद्वारे जी वेळ सूचित केली आहे, त्या वेळेशी हे गणित जमत नाही.

सर्व कलावंतांनी समजून-उमजून भूमिका केल्या आहेत. श्रीराम खरे (संन्याल) व भालबा केळकर (चावला) यांचा विशेपत्वाने उल्लेख करणे जरूर आहे.

नाटकाची निर्मितिमूल्ये उत्कृष्ट आहेत. पाश्चात्य संस्कृतीची छाप असलेल्या वातावरणाशी मिळते-जुळते पार्श्वसंगीत प्रयोगाची रंगत वाढवते.

प्रेक्षक आणि कलावंत यांच्यांतील अंतर दूर करण्यात दिग्दर्शक यशस्वी झाल्याने रहस्याची उकल होत असताना आपण घटनास्थळी प्रत्यक्ष हजर आहोत, असे प्रत्येक प्रेक्षकाला वाटते.

असा हा सुंदर नेटका प्रयोग प्रत्येक नाट्य-प्रेमिकाने अवश्य पाहावा, असे सुचवावेसे वाटते.

– शरद गोखले




" कोणीच नाही. त्यांनी पुढं जायचं ठरवलं आणि आम्ही नाही त्यांना थांबवू शकलो. " इनुयेच्या वरिष्ठ अधिकाऱ्याने अगतिक होऊन उत्तर दिले.

त्या दिवशी तुकडीने पाच मैल मुसंडी मारली. राष्ट्राध्यक्ष रुझवेल्टनी त्यांना आपली राष्ट्रनिष्ठा सिद्ध करायची संधी दिली होती. त्या राष्ट्राध्यक्षांना याहून अधिक भावपूर्ण आदरांजली कशी वाहता येणार होती ?

१९४५ साली हिटलरची सर्व आघाड्यांवर पीछेहाट होत होती. परंतु या विजयासाठी दोस्तांना फार मोठे मोल द्यावे लागत होते. कारण नाइलाज होईपर्यंत जर्मन सैनिक रणातून काढता पाय घेत नसत. या पडत्या काळातही उत्तर इटलीमध्ये पंचवीस जर्मन आणि पाच इटालियन फॅसिस्ट डिव्हिजन्स होत्या. शिवाय जर्मनीतील नाझी सेना दक्षिणेला बव्हेरियन आल्प्सच्या दिशेने सरकत होत्या. त्यांना इटलीमधील सैन्याची जोड मिळाली असती तर त्यांनी मोठी मजबूत संरक्षक फळी निर्माण केली असती. ही फळी फोडणे मग दोस्तांना मोठे कठीण होणार होते.

एप्रिलच्या सुरुवातीला जर्मन कैदखान्यातून पळालेल्या दोस्त युद्धकैद्यांकडून काही महत्त्वाच्या वार्ता मिळाल्या. त्यातील एका वार्तेप्रमाणे औद्योगिक यंत्रसामग्री मिलान आणि तुरीनहून आल्प्समध्ये हलविण्यात येणार होती. तेथे तिला साहजिकच नैसर्गिक संरक्षण लाभणार होते. एकूण हिटलर अत्यंत प्रखर अंतिम प्रतिकाराची सिद्धता करीत होता. त्याला तोंड देण्यासाठी इटलीतील दोस्त सेनेपुढे एकच मार्ग होता. पो नदीच्या खोऱ्यात असलेली जर्मन सेना, पार करण्यात अत्यंत कठीण अशा अॅडीज नदीच्या मागे संरक्षक फळी उभारण्यापूर्वीच त्या सेनेचा बीमोड करायचा.

## घटका भरली होती ?

एप्रिलच्या ५ तारखेला सैन्याच्या पाचव्या विभागाला आगेकूच करण्याचा हुकूम मिळाला. त्याच वेळेला इनुयेची चारशेवेचाळिसावी तुकडी पश्चिम किनाऱ्यावर धडक मारू लागली. इनुयेच्या तुकडीवर कामगिरी होती ती जर्मनांना खिळवून ठेवण्याची. त्याच वेळेला पूर्व किनाऱ्याकडून सैन्याचा आठवा विभाग अधिक प्रखर हल्ला चढविणार होता. इनुये आणि त्याचे सहकारी यांना मिळालेला हुकूम स्पष्ट होता :– सर्व शक्तिनिशी जर्मनांवर तुटन पडा. प्रथम मास्त आणि कारारा काबीज करा. आणि नंतर लिगुरियाच्या किनारपट्टीने जिनोवापर्यंत जाऊन धडका. आणि यात वेळ कोठेही गमावून चालण्यासारखे नाही.

पुढील दोन आठवड्यांत, इनुयेच्या तुकडीने पर्वतावर जागोजाग दबा धरून बसलेल्या जर्मन सैन्यावर निकराचा मारा चढविला आणि हुकमाप्रमाणे मास्त आणि कारारा ही ठिकाणे इटालियन भूमिगत कार्यकर्त्यांच्या मदतीने सर केली. आता त्यांच्यापुढे पो नदीचे खोरे होते. परंतु ज्या वेळी अंतिम विजयाचा मार्ग खुला झाला

असे वाटले त्याच वेळी त्यात सॅन टेरेन्झोनची टेकडी आडवी आली. त्या टेकडीला नाव नव्हते, क्रमांक नव्हता. इनुयेच्या मार्गातील ती एक प्रचंड धोंड होती. तिच्यावर कबजा मिळवणे प्राप्तच होते; मग त्यासाठी कितीही प्राणांचे मोल का द्यावे लागेना, त्या टेकडीच्या लढाईतच, सुरुवातीला वर्णन केल्याप्रमाणे, खुद्द इनुयेच्या पाठीत गोळी घुसली होती. काही स्नायूंच्या दुबळ्या तंतूंवर खांद्यापासून त्याचा उजवा हात निर्जीवपणे लोंबत होता. आणि नजरेत तिरस्कार भरलेला एक जर्मन सैनिक बंदूक इनुयेच्या छातीवर रोखून अवघ्या दहा पावलांवर उभा होता. एकूण इनुयेची घटका भरली होती. आजवर अनेक घनघोर लढ्यातून इनुये मोठ्या आश्चर्यकारक रीतीने सहीसलामत सुटला होता. आता मात्र कृतान्त काळाची त्याच्यावरील पकड सुटणे शक्य नव्हते.

बंदुकीच्या चापावरील आपले बोट घट्ट करीत असतानाच तो जर्मन सैनिक इनुयेकडे पाहत तिरस्काराने हसत राहिला. त्याच्या हास्यामुळेच गोळी लगोलग सुटली नाही. तेवढा क्षणार्धाचा विलंब इनुयेला पुरला. खरे म्हणजे इनुये अर्धवटच शुद्धीवर होता. त्याचे शरीर असह्य वेदनांनी ठणकत होते. जागोजाग झालेल्या जखमांतून रक्त वाहून गेल्यामुळे तो क्षीण झाला होता. आणि त्याच्या डोळ्यांवर झापड आली होती. एक क्षणभर तो स्थिर राहिला असता तर या साऱ्या भयंकर अवस्थेतून त्याची सुटका त्या यमदूत जर्मन सैनिकाने केली असती. परंतु पर्ल हार्बरवर जपान्यांनी हला चढविल्यानंतरच्या काही दिवसांत केवळ निसेई असल्याने अत्यंत राष्ट्रनिष्ठ इनुयेचा पदोपदी अपमान झाला होता. त्या अपमानाचा कलंक


**दीपावली स्पर्धेत बिनचूक कोणीही नाही**

लिट्क्विझ नं. ४२ मध्ये जिंका **रु. ४१,०००**

प्रवेश-पत्रिका प्रत्येक रविवारी **नवशक्ती** मध्ये प्रसिद्ध होते

१५ भाषांत, १२५ एजंट्स, २३० पत्रांत जाहिरात

घुऊन काढण्याचा इनुयेचा निर्धारच आता इनुयेच्या शरीरात अचानक एकवटला. जमिनीवर पडलेला हातबॉम्ब उचलण्यासाठी इनुये डाव्या बाजूला झुकला होता. त्याच बाजूला तो पडेल अशी साहजिकच त्या जर्मन सैनिकाची अपेक्षा होती. त्या ऐवजी इनुयेने विजेच्या वेगाने शरीर उजव्या बाजूला फेकले आणि आपल्या विछिन्न हातावर तो कोसळला. त्यासरशी उठलेल्या वेदनेने त्याच्या तोंडून नकळत अस्फुट किंकाळी बाहेर पडली. परंतु त्या जर्मन सैनिकाने डाव्या बाजूला झाडलेल्या गोळीच्या आवाजात तिचा लोप झाला. जमिनीवर कोसळतानाच इनुयेने डाव्या हाताने तो पडलेला हातबाँब उचलण्याची खटपट केली होती; आणि तो त्याच्या हाती लागलाही. एकाच झटक्यात अंधुकपणे दिसणाऱ्या त्या बंदूकधारी जर्मन सनिकावर त्याने हातबाँब भिरकावला. प्रचंड आवाज झाला. एक किंकाळी ऐकू आली आणि सारे शांत झाले.

## टेकडी घेतलीच पाहिजे

इनुयेने डोळे उघडले तेव्हा त्या जर्मन सैनिकाचे छिन्नभिन्न कलेवर त्याला दिसले. त्याच्याकडे पाहत असतानाच डाव्या बाजूने कसलासा आवाज ऐकू आला. इनुयेने नजर वळवली. त्याचा मित्र इवानो वीन नाझी सैनिकांशी लढत होता. इनुये कष्टाने गुडघे टेकून बसला. खाली पडलेली टॉमीगन त्याने उचलली. इवानोशी लढणाऱ्या जर्मन सैनिकांचे इनुयेकडे लक्ष नव्हते. इनुयेने त्यांच्यावर सहज गोळ्या घातल्या. मात्र अखेरच्या क्षणी त्यांच्यापैकी एकाचे लक्ष इनुयेकडे गेले होते. त्याने झाडलेली गोळी इनुयेच्या उजव्या पायात घुसली आणि तो टेकडीच्या उतारावरून, एखादा निखळलेला दगड कोसळावा तसा खाली कोसळला. आपल्या शरीराच्या चिंध्या होत आहेत असे इनुयेला प्रत्येक धक्क्यासरशी वाटत होते. सुदैवाने एका झाडाच्या बुंध्याला तो अडला आणि चिंध्याच्या बाहुलीसारखा तेथेच पडून राहिला. त्याला अस्पष्ट आवाज ऐकू येत होते. भोवती वावरणाऱ्या माणसांच्या अंधुक छाया दिसत होत्या. शत्रूच्या गोळ्यांमुळे हादरणारी भूमी जाणवत होती. पण थोडीसुद्धा हाल-चाल करणे मात्र शक्यतेच्या पलीकडे गेले होते. झोप, दीर्घकाळ केवळ झोप घ्यावी, असे त्याला वाटत होते.

"स्ट्रेचर आणा इकडे आपल्या लेफ्टनंटसाहेबांना तावडतोब मदत मिळाली पाहिजे." कोणीतरी म्हणाले. जर्मन सैनिकांच्या तिरस्कारयुक्त हास्याने जो परिणाम झाला होता तोच इनुयेवर याही शब्दांनी झाला. सहकारी प्रतिबंध करीत असता-नाही तो आपल्या पायांवर उभा राहिला आणि डाव्या हातात टॉमीगन पकडून टेकडी चढू लागला.

कोणीतरी म्हणाले, "डॅन, बाबा नको जाऊ वर. खाली उतर कसा."

तोंडातून शब्दोच्चार करणे अवघड होत असूनही इनुये पुटपुटला, "पण आपण त्याला वर गेलंच पाहिजे. टेकडी घेतलीच पाहिजे."

आणि त्यांनी ती टेकडी खरोखरच घेतली. अजिंक्य समजली जाणारी ती टेकडी इनुयेच्या विलक्षण नेतृत्वाने झपाटलेल्या त्याच्या सहकाऱ्यांनी पराक्रमाची शर्थ करून जिंकून घेतली. टेकडी जिंकल्यावर तिच्या संरक्षणाचे काम इनुयेने आपल्या सहकाऱ्यांमध्ये वाटून दिले. ती व्यवस्था झाल्यावर इनुये म्हणाला, " सुनोडा, डाव्या बाजूला शत्रूकडे जरा विशेष लक्ष द्यायला पाहिजे. आणि शिवाय ..."

इनुयेला वाक्य पुरे करता आले नाही. तो हळूहळू खाली कोसळला, इनुये नावाचे अद्‌भुत युद्धकौशल्य दाखवणारे यंत्र काही काळ तात्पुरते बंद पडले होते.

आणखी एका महिन्याच्या आत इनुयेच्या तुकडीची युद्धकामगिरी संपली. इनुयेला मात्र आपल्या जखमांशी निर्धाराने लढा चालूच ठेवावा लागला. जवळजवळ दोन वर्षे वेगवेगळ्या खास इस्पितळांतून त्याच्यावर उपचार करण्यात आले. त्यात त्याला सतरा वेळा रक्तदान घ्यावे लागले. त्या काळात एका हाताने सारे व्यवहार करण्याची कला त्याला अपरिहार्यपणे आत्मसात करावी लागली.

पो खोऱ्यातील लढाईसाठी त्याला विशेष सेवापदक मिळाले. त्याशिवाय एक ' ब्राँझ तारा ' आणि तीन ' पर्पल हार्ट्स् ' ही पदके मिळाली ती वेगळीच. जॉर्ज वॉशिंग्टन विद्यापीठामधून त्याने कायद्याची पदवी संपादन केली. त्यानंतर स्थानिक प्रतिनिधीसभेवर त्याची निवड झाली. १९५९ साली हवाई बेटाला घटक संस्थानांचा दर्जा प्राप्त झाला; आणि हवाई संस्थानांतून काँग्रेसवर इनुयेची निवड झाली. लवकरच तो सिनेटवर निवडून गेला.

काँग्रेस–सभासद म्हणून इनुये प्रथम ज्या वेळी सभागृहात आला त्या वेळी सभापती सॅम रेबर्न यांनी मोठ्या आत्मीयतेने त्याला सभागृहाचा कोनाकोपरा दाखवला आणि ते म्हणाले, " काँग्रेसमध्ये, मी सभापतीच असल्यामुळे मला सगळेजण ओळखतात. त्यानंतर मला वाटतं तुझा क्रमांक लागेल. "

इनुये गोंधळला, त्याच्या प्रश्नार्थक चेहऱ्याकडे पाहून सॅम रेबर्ननी स्पष्टीकरण केले, " असा आश्चर्यचकित होऊ नकोस. या काँग्रेस सभागृहात एक हाताचे जपानी काँग्रेस–सभासद काही फार नाहीत !" ○

# तुमचे भविष्य

# आमचा अंदाज

श्री. गो. जोशी, सायनाचार्य

## नोव्हेंबर ९ ते १६ राशी-भविष्य

**मेष :** साडेसातीबद्दल आपण कधीच चिंता केली नव्हती. आता मंगळ षष्ठात आल्यामुळे आता तर नाहीच नाही.

या आठवड्यापासून व्यवसायाचे नवे क्षेत्र हस्तगत कराल. प्रगतीच्या नव्या वाटांनी वाटचाल करायला लागाल. व्यवसायाचे नवे तंत्र आत्मसात केल्यामुळे अपयशाची धास्ती बाळगायचे कारण नाही. धावपळ-धडपड मात्र इतकी करावी लागेल की, आगामी महिन्याभरात आपणांस क्षणाचीही उसंत मिळणार नाही.

यांत्रिक व संशोधन विभागांत तुम्हांला महत्त्वाचे स्थान लाभेल. सांपत्तिक अडचणी तीव्रतेने जाणवणार नाहीत. स्थापत्याच्या क्षेत्रात तर तुमचे स्थान खूपच उंचावेल.

दि. १८–१९–२२ आपल्या कामाला चालना मिळेल.

**वृषभ :** गुरू पंचमस्थानी आणि मंगळ-हर्षलही त्याच्या सन्निध्यात. कित्येक वर्षांनंतर इतका सर्वांगाने विकासाचा काल तुमच्या वाट्यास येत आहे. गेल्या ४–६ महिन्यांत शिकस्तीचा प्रयत्न करूनही जे घडू शकले नाही, ते आता सहजासहजी घडून यऊ लागेल.

या कालापासूनच आपल्या आशा-आकांक्षांची क्षितिजे विस्तारतील. कर्तृत्वाचा परीघ वाढू लागेल. प्रगतीच्या नव्या वाटेने पावले पडायला लागतील.

नोकरीधंद्यात अनपेक्षितपणे प्रगती होईल. साहित्य-कला क्षेत्रांत अपेक्षेबाहेर यश लाभेल. दवी कृपेचा प्रत्यय हातोहात यायला लागेल. मंगल कार्याचे निश्चित ठरेल.

दि. १६–१७–२० या कालात अनपेक्षितपणे लाभ व्हावा.

**मिथुन :** मंगळ चौथा आणि गुरू–हर्षलही तिथे. आगामी काल फारसा स्वास्थ्याचा, प्रगतीचा दिसत नाही. सारी कामे गतिशून्य बनू लागतील. इष्ट मित्रांचा विरोध तीव्रतेने जाणवायला लागेल. अनारोग्याची डोकेदुखी सहन करावी लागेल. तरीसुद्धा तुमचा निर्धार तुम्हांला अपयश देणार नाही. ओढाताण जाणवली तरी प्रतिष्ठेला धक्का लागणार नाही. उद्योगधंद्यांतील अडीअडचणींवर मात करू शकाल.

राहत्या जागेच्या कटकटी आणि वरिष्ठांचा जाच मधून मधून सहन करावा लागेल.

दि. १८ ते २१ या काली आपले प्रयत्न यशस्वी ठरावेत.

**कर्क :** एकटा पराक्रमातील मंगळही तुमचा नजीकचा भविष्यकाल उज्ज्वल असल्याची ग्वाही देऊ शकेल. गेल्या ३–४ महिन्यांतील साऱ्या व्यथा-विवंचना मिटून जातील. स्थानांतर–नोकरीत बदल. दूरचा प्रवास यांपैकी काहीही, केव्हाही घडू शकेल.

तुमच्या नोकरीधंद्यांतील सारे पेचप्रसंग सुटण्याची लक्षणे दिसायला लागतील. वाहनाचा प्रश्न सुटेल, नवे घर लाभेल, अधिकाराच्या स्थानावर नियुक्ती होईल. दि. २० च्या अमावास्येनंतर सारे काही अपेक्षेप्रमाणे घडून यायला लागेल.

दि. २० तें २२ विशेष अनुकूल काल.

**सिंह :** मंगळ द्वितीयस्थानी आला आणि आठव्या शनीला शह बसला. आता सहसा तो तुमच्याकडे वक्रदृष्टीने पाहण्याचे धाडस करणार नाही. याचा अर्थ हे दिवस आपणांस सर्वार्थाने अनुकूल आहेत असा समज करून घेऊ नका.

सतत परिश्रम करावे लागतील, अनेकांचे सहकार्य घ्यावे लागेल, कोणतीही गोष्ट करण्यापूर्वी दहा वेळा विचार करावा लागेल. अपयश पदरी घ्यावे लागणार नाही एवढाच या अनुकूलतेचा अर्थ.

प्रकृतीचा ताण वाढेल. सांपत्तिक चणचणही जाणवेल. काही दिवस सहन करण्यावाचून गत्यंतर नाही.

दि. १७–१८–१९ या काली अनपेक्षितपणे अनेक चांगल्या गोष्टी घडाव्यात.

**कन्या :** शनीचे आव्हान आणि मंगळाचा छळवाद यांमुळे आपण अगदी त्रस्त होऊन गेला असाल. त्यातल्या त्यात थोडीशी समाधानाची गोष्ट एवढीच की, गुरूचे तुमच्या राशीत आगमन घडले आहे. तो कोणत्याही गोष्टीचा अतिरेक होऊ देणार नाही.

मानसिक, शारीरिक त्रास आता पूर्वीइतका होणार नाही. या वेळी आपणांस प्रत्येक गोष्टीत मिळते जुळते घ्यायला हवे.

भागीदारी चिघळू देऊ नका. नोकरीधंद्यांत बदल घडवून आणण्याचे टाळा; व्यावसायिक साहसाला ही वेळ मुळीच अनुकूल नाही.

दि. १९ तें २१ या काली अनेकांचे साहाय्य लाभेल.

**तूळ :** व्ययस्थानी मंगळासह अनेक विशाल ग्रह आलेले आहेत आणि त्यांच्या समोरच शनी-राहूंचा धिंगाणा चालू आहे. ही ग्रहस्थिती तुम्हांला स्वास्थ्य लाभू देणार नाही.

आगामी महिन्याभरात अनेक अडीअडचणींशी आपणांस निकराने झगडावे लागेल. सांपत्तिक ताण, अनारोग्य, शत्रुत्व इ. प्रकार अनेक वेळा अनुभवावे लागतील. एकच समाधानाची गोष्ट शुक्र तृतीयेतून जात आहे ही. साहित्यिकांना, कलावंतांना या वेळी आकर्षक संधी लाभतील, नवे करारमदार होतील. अंगच्या अभिजात गुणप्रवृत्तींना याच वेळी चालना मिळेल.

दि. १८ ते २० थोडेफार यश या वेळी पदरी पडावे.

**वृश्चिक :** सध्यातरी निदान कोणत्याही क्षेत्रातील आघाडीवरची माणसे वृश्चिक राशींची असावीत असे अनुमान काढले तर ते चुकीचे ठरू नये. कित्येक वर्षांनी त्यांच्या राशीच्या एकादशात गुरू आलेला आहे. तो त्यांच्या प्रतिष्ठेची पातळी उंचावेल.

अनपेक्षितपणे फार मोठे लाभ पदरी पडतील. नोकरीतील प्रतिष्ठेचे स्थान तुमच्याच वाटचास येईल. अनेकांनी तुमच्यापासून धडा घ्यावा असं काही भव्यदिव्य आपण करू शकाल.

अर्थशास्त्र, समाजशास्त्र, संशोधनक्षेत्र यांमध्ये तुमचे स्थान निश्चितच उंचावेल नवे स्नेहसंबंध जोडले जातील. मंगल कार्ये निश्चित ठरतील. तुमच्या ज्या ज्या अपेक्षा असतील त्या त्या साऱ्या सफल होतील.

दि. १६–१८–२१ या दिवसांची नोंद करा. काही विशेष अनुकूल घटना घडतील.

**धनू :** गुरू-मंगळादी अनेक ग्रह अनुकूल असूनही हे दिवस आपणांस फारसे स्वास्थ्याचे आहेत असं वाटत नसेल. चौथा शनी हे याचं कारण. अजूनही १–१॥ महिन्यात तरी आपणांस हे अस्वास्थ्याचे प्रसंग अनुभवावे लागतील.

मुख्यत: आरोग्य, स्थावर आणि व्यवसाय यांवर थोडेफार आघात व्हायला लागतील. विरोधक उठाव घेतील. नोकरीधंद्यांत थोडीफार माघार घ्यावी लागेल स्थावराची, राहत्या जागेची विवंचना वाढू लागेल.

असे असूनही आपल्या प्रतिष्ठेला धक्का लागणार नाही की, आपले व्यावसायिक वातावरण काळजी वाटण्याइतके बिघडणार नाही.

दि. १९ ते २१ या काली अनेकांचे सहकार्य लाभेल.

**मकर :** गुरु भाग्यात आला आणि तुमचे दैव हसू लागले. भाग्यस्थ गुरूचे सामर्थ्य ज्याला लाभले त्याला अशक्य, अवघड असे काहीच वाटेनासे होते. गुरूच्या सान्निध्यात हर्षलही असल्यामुळे अनपेक्षितपणे तुमच्या जीवनात अनंत प्रगत घटना घडून यायला लागतील.

अनेक टप्पे ओलांडून आपण प्रगतीच्या अत्युच्च स्थानावर पोचाल. नोकरीधंद्यांत तर आजवर कधीच लाभली नाही एवढी प्रतिष्ठा लाभेल. तुमच्या जीवनातील हा एक परमोत्कर्षाचा काल आहे अशी पदोपदी जाणीव व्हायला लागेल. तुम्हांपैकी कित्येकांना परदेशास जाण्याची संधी लाभेल.

दि. २० ते २२ या कालाचे स्मरण चिरंतन राहील.

**कुंभ :** साडेसातीसाठी म्हणून नव्हे, आठव्या मंगळासाठी आपणांस काही दिवस जपूनच वागायला हवे. प्रकृतीबद्दल जागरूक राहायला हवे. सांपत्तिक ताण असह्य होऊ नये म्हणून, अनवश्यक खर्चाला आळा घालायला हवा.

शुक्रासारखा ग्रह लाभस्थानी असल्यामुळे तुमच्या सावधगिरीला यश लाभेल.

नोकरीधंद्यांत बदल किंवा व्यावसायिक साहस या गोष्टी प्रकर्षाने टाळायला हव्यात.

दूरचा प्रवास, मंगल कार्ये आणि सामाजिक कार्ये या गोष्टी काही दिवस पुढे ढकलणे भाग आहे. नोकराचाकरांवर आणि इष्ट मित्रांवर फारसे अवलंबून राहू नका.

दि. १७ ते २० या काली अनेक कामे झटपट उरकावी लागतील.

**मीन :** साडेसाती आणि सातवा मंगळ या दोन अनिष्ट ग्रहांनी तुम्हांला अगदी धारेवर धरले आहे.

मन:स्थिती फारच बिघडेल, आरोग्य चांगले राहणार नाही आणि नोकरीधंद्यात अपेक्षेप्रमाणे काहीच घडणार नाही.

अशाही अनिष्ट काली सूर्य भाग्यस्थानी आहे एवढाच एक दिलासा. ऐनवेळी थोरांचे साहाय्य लाभेल, घसरू पाहणारे गाडे इष्ट मित्रांच्या साहाय्याने सांभाळले जाईल.

कौटुंबिक वातावरण आणि भागीदारीचे व्यवहार यांवरच प्रामुख्याने या अनिष्ट ग्रहांचा रोख दिसतोय.

दि. १६-१८-२१ थोडेफार यश पदरी पडावे. ○

MANOOS (Weekly) : 40 Paise : Regd No. M H–649

तीन बोलक्या घटना....

□ १९३९ मध्ये स्टॅलिनने पोलंडवर हल्ला चढविला.

□ १९५६ मध्ये ख्रुश्चेव्हने हंगेरीचा आवाज बंद पाडला.

आणि आता

□ १९६८ मध्ये कोसिजिनने चेकोस्लोव्हाकियात रणगाडे घुसविले.

समाजवादाच्या नावाखाली साम्राज्यवादाचा आविष्कार घडविणाऱ्या कम्युनिस्ट रशियाच्या मूलप्रेरणांचा मागोवा

व्होल्गा जेव्हा लाल होते

| लेखक | प्रस्तावना | मूल्य |
|---|---|---|
| वि. स. वाळिंबे | ना. ग. गोरे | अठरा रुपये |

१ ऑक्टोबरला प्रसिद्ध झाले.

राजहंस प्रकाशन, ४१९ नारायण पेठ, पुणे २

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक **श्री. ग. माजगावकर** यांनी संगम प्रेस प्रा. लि., १७-बी, कोथरूड, पुणे ४, येथे छापून, ४१९, नारायण पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. **श्री. ग. माजगावकर.**